उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. २२.०८.२०२४ | अंक नं. १४७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020





आकर्षक टॉईजवर २५% सूट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट ॲण्ड टॉईज
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर.
मो : 9325329061 / 9373417113








## कल्याण रोड येथील सीना नदी पुलावर वाहनांच्या लांबच लांब रांगा, वाहतुकीची कोंडी

कल्याण रोड येथील सीना नदी पुलावर दररोज सकाळी वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. शाळेचे विद्यार्थी, एसटी, नोकरदार वर्ग, नागरिकांना वाहतुकीच्या कोंडीचा सामना करावा लागतो. वाहतूक पोलीस नसल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागतो. शहर वाहतूक नियंत्रण शाखेने वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी होत आहे. तसेच लोंढे मळा येथे गेल्या आठ ते दहा दिवसापासून ड्रेनेजचा चेंबर फुटल्याने रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाणी पसरले आहे. यामुळे कल्याण रोड येथील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न देखील गंभीर बनला आहे. महापालिकेने ड्रेनेजच्या चेंबरची दुरुस्ती करावी.

## १ लाखांहून अधिक महिला गायबप्रकरणी उच्च न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस

मुंबई – महाराष्ट्रातून गेल्या ५ वर्षात १ लाखांहून अधिक महिला गायबप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस बजावली आहे.

याबाबत शहाजी जगताप या माजी सैनिकाने हायकोर्टात याचिका दाखल केली होती. याच याचिकेवरील सुनावणी दरम्यान, राज्य महिला आयोग आणि जीआरपीला यासंदर्भात भूमिका स्पष्ट करत, योग्य त्या उपाययोजना सुचवण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

आकडेवारीनुसार, सन २०१८ ते २०२२ या पाच वर्षांत महाराष्ट्रातून १ लाखांपेक्षा जास्त महिला बेपत्ता झाल्या आहेत, ज्यांचा आजवर काहीच ठावठिकाणा लागलेला नाही. याबाबत आता राज्य महिला आयोग तसेच, मोठ्या संख्येने लोक गायब होण्याच्या तक्रारी असलेल्या रेल्वे पोलिसांना उत्तर देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने जारी केले आहेत.

तसेच, यासंदर्भात काय उपाययोजना करण्यात येतील, ते देखील सांगण्याचे निर्देश दिले आहेत. अशातच, चार आठवड्यांत सुचवण्याचे निर्देश देत सुनावणी ऑक्टोबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली.

# बँक खात्यातून १ लाख २० हजार रुपयांची रक्कम ऑनलाईन परस्पर काढून घेत वृद्धाची फसवणूक

नगर – कुठलाही ओटीपी दिलेला नसताना, कोणतेही मोबाईल ॲप डाऊनलोड केलेले नसतानाही सेवानिवृत्त असलेल्या वृद्धाच्या बँक खात्यातून २ दिवसांत ४ वेळा ३० हजार याप्रमाणे १ लाख २० हजारांची रक्कम अज्ञात व्यक्तीने परस्पर काढून घेत आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार नगरमध्ये उघडकीस आला आहे.

याबाबत भास्कर शंकर मोरे (वय ७४, रा. बालिकाश्रम पाठीमागे, सर्वोदय कॉलनी, दिल्लीगेट) यांनी बुधवारी (दि.२१) रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी मोरे यांचे भारतीय स्टेट बँकेत खाते आहे. या खात्यात त्यांची सेवानिवृत्तीची रक्कम जमा होत असते. त्यांच्या बँक खात्यातून १६ ऑगस्ट रोजी गुगल पे द्वारे ३ वेळा प्रत्येकी ३० हजार रुपये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने परस्पर काढून घेतले.

त्यानंतर पुन्हा १७ ऑगस्ट रोजी २९ हजार ९९९ रुपये गायब झाले. असे दोन दिवसांत त्यांच्या बँक खात्यातून एकूण १ लाख १९ हजार ९९९ रुपये परस्पर काढून घेण्यात आले. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्याकडे कोणाचा फोन आला होता का? कोणी ओटीपी मागितला होता का? किंवा मोबाईलमध्ये एखादे ॲप डाऊनलोड केले का, याबाबत चौकशी केली. मात्र असे काहीही झाले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी बुधवारी रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरुद्ध भा.दं.वि. कलम ३१९, ३१८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो. हे. कॉ. योगेश चव्हाण हे करत आहेत.

# शहरातील सर्व गणेश मंडळांची २३ ऑगस्ट रोजी मनपात बैठक

नगर – गणेशोत्सवाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व गणेश मंडळाची बैठक २३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. या करीता शहरातील सर्व गणेश मंडळ यांचे पदाधिकारी/प्रतिनिधी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे. बैठकी दरम्यान गणेश मंडळाच्या मंडपास देण्यांत येणाऱ्या परवानग्याकरीता मनपा तर्फे एक खिडकी योजना राबविण्यांत येणार आहे. परवानग्या मंडळाच्या सोई करीता ऑनलाईन पध्दतीने देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

# विनापरवाना मागविलेल्या ‘फटाक्यांचा ट्रक’ पकडला

### १२ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल केला जप्त; चौघांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – परराज्यातून विनापरवाना मागावलेल्या विविध प्रकारच्या फटाक्यांचा साठा असलेला मालट्रक नगर तालुका पोलिसांनी पकडला आहे. मंगळवारी (दि.२०) रात्री अरणगाव बायपास चौकात ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत फटाक्यांचे बॉक्स, मालट्रक असा १२ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर तालुका पोलिसांचे पथक रात्र गस्त घालत असताना अरणगाव बायपास चौकाकडे दौंड रोड कडून एक मालट्रक येताना दिसला. या ट्रक बाबत पोलिसांना संशय आल्याने त्यांनी ट्रक चौकात थांबवला. ट्रक मध्ये विविध प्रकारच्या फटाक्यांचे बॉक्स आढळून आले. याबाबत ट्रक मध्ये असलेले चालक पुन्नुस्वामी सी चिन्नुपिल्ले (वय ४३) तसेच क्लीनर भुवनेश्वर आन्नादुराई (वय २२, दोघे रा. विरा कोंडणपट्टी, तामिळनाडू) यांच्या कडे चौकशी केली असता त्यांच्याकडे फटाके वाहतुकीबाबत कुठलाही परवाना आढळून आला नाही, तसेच त्यांनी सदर फटाके हे स्फोटक व ज्वलनशील पदार्थ आहेत, त्यामुळे मानवी जीविताला अपाय होऊ शकतो हे माहित असूनही कुठलेही, अग्निशामक यंत्रणा व अन्य उपाययोजना केलेल्या नसल्याचे दिसून आले.

त्यांच्या कडे सदर फटाके कुठे घेवून जात आहे अशी विचारणा केल्यावर त्यांनी सदर फटाके तामिळनाडू येथील कारखान्यातून आणलेले असून फटाक्यांची ऑर्डर ही एमआयडीसी येथील किरण संजय खामकर, अमोल संभाजी जाधव यांनी दिलेली असल्याचे सांगितले. खामकर व जाधव यांच्याकडे ही कसल्याही प्रकारचा फटाके मागविण्याचा, बाळगण्याचा, विक्रीचा परवाना आढळून आला नाही. त्यामुळे पोलिसांनी सदर फटाक्यांचे बॉक्स, मालट्रक असा १२ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत पो.कॉ. विजय साठे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून चौघांच्या विरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम २८८, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा. यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220 8888362220

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा 500 ते 1000 रु.
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा..
माल फ्री घरपोहोच
अंबर प्लाझा बेसमेंट, नमो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

घर गळत आहे का?
आकांक्षा वॉटर प्रुफिंग
आम्ही करुन देणार आपणांस प्रशिक्षित लोकांकडून वॉटर प्रुफिंग ते ही गॅरंन्टी सह.
एकदा वॉटर प्रुफिंग कराल तर परत वॉटर प्रुफिंग करण्याची गरज असणार नाही.
वॉटर प्रुफिंग कुलपेंन्ट सह 5 वर्षे गॅरंटी
9403720239







जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## जाने कहाँ गये वो दिन...

व्याकुळपणे तू म्हणतोस, ''तेव्हा साद पोचत होती, आता ती देऊनही पोहचत नाही. एवढे अंतर कसं निर्माण झालं?'' अरे प्रेम जड पाहण्याच्या नवथर वळणावर दोघांचं म्हणणं एकच असतं. त्या वयात आयुष्य उनाड असतं. जमीन हरवलेली असते. निसर्गातील उर्जा कणांकणांतून धावत असते, तेव्हा दोन्ही जीवांना एकच ओढ...

पुढे पुढे... सणसणून उन्हं तापतात. नवनवे भोवरे ओढतात. खोल, गंभीर समुद्राचं शहाणपण येतं. हीच वेळ महत्त्वाची. दुसऱ्यांचीही वेगळी वाट मान्य करण्याची. तेव्हाच अपेक्षित असतं परस्परांचं सामंजस्य. ते असलं तर साद पोचते.

पण जेव्हा निर्जिव शांतता, औपचारिकता असते तेव्हा... दोघंही जेव्हा स्वतःचंच गाणं स्वतःच्याच सुरात गाऊ लागतात तेव्हा साद पोचत नाही. एकाचा सुर दुसऱ्याला व्यत्यय वाटतो.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



असंच होतं बहुसंख्य नात्यांत. फक्त सुदैवाने अजूनही समाज व काहीशा एकत्र कुटुंब पद्धतीमुळे या २ जीवांच्या त्यांच्या दोन दिशांच्या दोन वेगवेगळ्या गाण्यांनी जगासमोर तमाशा होत नाही. पण बदलत्या काळवेळ प्रवृत्तीनुसार नवीन पिढीत नातं जुळवणं वा तोडणं सहजसोपं होतंय. वाढत्या, चांगल्या परिस्थितीने चंगळवादी भोग संस्कृतीने जोर पकडलाय. नैतिकता, नात्यासाठीची उत्कटता, त्याग लयाला जात आहे. हीच वेळ आहे पुनर्विचाराची, नात्यांना प्रेमाने सांभाळण्याची...

# केडगाव उपनगरामधून पळविलेल्या अल्पवयीन मुलीची १२ तासांत सुटका

## आरोपीसह रायगडच्या कर्जत रेल्वेस्थानकावरून घेतले ताब्यात

नगर - केडगाव उपनगरातून पळवून नेलेल्या एका १४ वर्षीय शाळकरी मुलीचा गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या १२ तासांत शोध घेत तिची सुटका करण्यात कोतवाली पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी आरोपीसह पिडीत मुलीला बुधवारी (दि.२१) रात्री रायगड जिल्ह्यातील कर्जत रेल्वेस्थानकावर तेथील रेल्वे पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे. यातील आरोपी हा ही अल्पवयीन निघाला आहे.

केडगाव उपनगरातून एक १४ वर्षांची मुलगी मंगळवारी (दि.२०) सकाळी १०.३० च्या सुमारास दुकानात जावून येते असे सांगून घरातून गेली होती. ती बराच वेळ घरी न परतल्याने तिच्या कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून न आल्याने तिला एका संशयिताने पळवून नेल्याची फिर्याद मुलीच्या आईने मंगळवारी मध्यरात्री कोतवाली पोलिस ठाण्यात दिली होती.

या घटनेचे गांभीर्य ओळखून शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या सूचनेनुसार पो. नि. प्रताप दराडे यांनी एक पथक नेमून त्यामार्फत सदर अपहरीत मुलीचा सर्वत्र कसून शोध सुरु केला. या पथकाकडे संशयित आरोपी बाबत कोणतीही माहीती नसतांना बेसीक पोलिसिंग वापर करुन आरोपींचे नातेवाईक व जवळचे मित्र यांच्याकडे बारकाईने तपास करीत असता त्यातील एका मित्राला आरोपीने एका अनोळखी नंबरवरून फोन करत पैशाची मागणी केली. पोलिसांना हे समजताच त्यांनी त्या मित्रांकडे अधिक चौकशी करत बारकाईने तपास केला असता पिडीत मुलगी व आरोपी हे कर्जत रेल्वे स्टेशन जि. रायगड येथे असल्याची माहिती मिळाली. या पथकाने तत्काळ कर्जत येथे जावुन तेथील रेल्वे पोलीसांची मदत घेवुन सदर पिडीत मुलगी व आरोपीला बुधवारी रात्री ताब्यात घेतले. सदर आरोपी हा ही अल्पवयीन असल्याचे तपासात समोर आले. हे दोघे नगरहून कोपरगाव तेथून दौंड, तेथून मुंबई, कल्याण व कर्जत येथे गेल्याचे पोलिस तपासात पुढे आले. ही कारवाई पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. विकास काळे, उपनिरीक्षक प्रविण पाटील व गुन्हे शोध पथकाचे पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, गणेश धोत्रे, सलीम शेख, नकुल टिपरे, विजय काळे, पो.कॉं. अभय कदम, सतिश शिंदे, महिला पो.कॉं. योगिता साळवे व दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांनी केली आहे.

# गुंडगिरीमुळे कामगारांमध्ये दहशतीचे वातावरण, अवैध धंदे चालविणाऱ्या टपऱ्यांचे अतिक्रमण हटवा

### एमआयडीसीमधील प्रश्नांवर आमदार संग्राम जगताप यांच्याशी उद्योजकांची चर्चा



एमआयडीसीमधील प्रश्नांवर आमदार संग्राम जगताप यांच्याशी चर्चा करताना उद्योजक.

नगर - एमआयडीसीमध्ये अवैध धंदे चालविणाऱ्या अनाधिकृत टपऱ्या वाढल्या असताना गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. या टपऱ्यांमध्ये दारू, चरस, गांजा, अफू असे अमली पदार्थ विकले जातात. त्याचे सेवन करून गुन्हेगारीचे प्रमाण या परिसरात वाढत आहे. या सर्वांमुळे एमआयडीसीमधील कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न देखील गंभीर झाला असल्याचे उद्योजकांनी स्पष्ट केले.

आमीच्या पुढाकारातून आमदार संग्राम जगताप यांच्याशी उद्योजकांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत उद्योजकांनी गुंडगिरी व अवैध धंदे बंद होण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. गुन्हेगारीचे केंद्र बनत चाललेल्या अवैध धंदे चालविणाऱ्या टपऱ्यांचे अतिक्रमण हटविण्याची मागणी देखील उद्योजकांनी लावून धरली.

एमआयडीसीत कंपन्यातून चोऱ्यांच्या घटना सर्रासपणे घडत आहे. विशेषतः बंद पडलेल्या कंपन्यांमध्ये वारंवार चोऱ्या होत असून, नुकतेच कामावरून परतणाऱ्या तीन कामगारांना रस्त्यात अडवून मारहाण करण्यात आली. यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमआयडीसीमध्ये कामासाठी येणाऱ्या परप्रांतीय लोक रात्री दारू पिऊन त्रास देत आहेत. त्याचा बंदोबस्त करा तसेच एमआयडीसीसाठी तीन गावांच्या ग्रामपंचायती आहेत. त्यांचा मालमत्ता कर वेगवेगळ्या तीन गाव मिळून करत असताना एकच म ालमत्ता कर लागू करावा. एमआयडीसीसाठी एमएसईबीचे सबस्टेशन मंजूर आहे. परंतु जागेअभावी सबस्टेशन होत नाही. त्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. सनफार्मा चौक ते निबळक बायपास रस्त्याची खूप दुरावस्था झाली असून, तो रस्ता दुरुस्त करावा. अपघात टाळण्यासाठी सनफार्मा चौकामधील सिग्नल चालू करण्याची मागणी आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी केली.

आमी संघटनेचे सर्व प्रश्न जाणून घेतल्यानंतर आमदार जगताप यांनी तात्काळ एमआयडीसीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना फोन लावून सर्व घटनेची विचारपूस केली. तर सर्व अवैध धंदे तात्काळ बंद होण्यासाठी कारवाई करण्याच्या सूचना केल्या. तसेच एमएसईबी अधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधून एमएसईबीचे सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे सांगितले. एमआयडीसीमध्ये कोणतीही घटना घडल्यास व काही अडीअडचणी निर्माण झाल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे सांगून उद्योजकांना त्यांनी धीर दिला.

या बैठकीसाठी उद्योजकांच्या आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, संजय बंदिष्टी, महेश इंदानी, राजेंद्र कटारिया, अरुण कुलकर्णी, प्रवीण बजाज, मिलिंद गंधे, मिलिंद कुलकर्णी, राजीव गुजर, प्रशांत विश्वासे, राजेंद्र शुक्रे, कल्पेश इंदानी, पुरुषोत्तम सोमानी, जुईली मुळे, विजय इंगळे, चिन्मय सूखथनकर, प्रफुल्ल नातू, निनाद टीपूगडे, नितेश लोढा आदी उपस्थित होते.

# वैद्यकीय व्यवसाय परवाना नसतानाही ओपीडी चालवत रुग्णांवर उपचार; बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल

नगर - कुठलाही वैद्यकीय व्यवसाय परवाना नसताना सेवा क्लिनिक निसर्गोपचार केंद्र नावाचा दवाखाना थाटून ओपीडी चालवत रुग्णांवर उपचार करणाऱ्या निपाणी फाटा (ता. श्रीरामपूर) येथील बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिस कासम शेख (पत्ता माहित नाही) असे या बोगस डॉक्टरचे नाव आहे.

याबाबत माळवडगाव (ता.श्रीरामपूर) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य पथकातील डॉ. उमेश राजेंद्र लोंढे यांनी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. निपाणी फाटा येथील सेवा क्लिनिक निसर्गोपचार केंद्रात अनिस कासम शेख या नावाचा व्यक्ती हा त्याच्याकडे कोणत्याही शासनमान्य मेडिकल कौन्सिलची वैद्यकीय व्यवसाय पदवी नसतानाही तो अनधिकृतपणे ओपीडी चालवत रुग्णांवर उपचार करत असल्याची माहिती माळवडगाव (ता.श्रीरामपूर) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य पथकाला समजली होती.

काही रुग्णांवर त्याने उपचारही केले असल्याचे समजल्यानंतर आरोग्य पथकाने तेथे जावून तपासणी केली असता सदर व्यक्ती अनिस शेख याच्या कडे कुठलाही वैद्यकीय व्यवसाय परवाना नसताना सेवा क्लिनिक निसर्गोपचार केंद्र नावाचा दवाखाना थाटून ओपीडी चालवत रुग्णांवर उपचार करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे या पथकातील डॉ. उमेश लोंढे यांनी सदर बोगस डॉक्टर अनिस शेख याच्या विरुद्ध वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३३ (ए) नुसार फिर्याद दिली असून पोलिसांनी या वरून गुन्हा दाखल केला आहे.

## अन्न सुरक्षा व मानदे कायद्याच्या आरोपातून एकाची निर्दोष मुक्तता

नगर - सेशन्स केस नं. २९४ /२०२३ मधील आरोपी जयसिंगं मंजाबापू उर्फ बाळू गागरे (वय ३१ वर्षे, रा. पारनेर, ता. पारनेर जि. अहमदनगर) या आरोपीची भा.द.वि. कलम ३२८, २७२, २७३, १८८ तसेच अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ चे २६ (२) (I), २६ (२) (Iv), २७ (३) (E), ३ (१) (Zz) (V), ३० (२) (A), ५९ सदर कायद्यातुन जिल्हा व सत्र न्यायाधिश पी. आर सित्रे यांनी निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकुण पाच साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीतर्फे ॲड. अजित प्रतापराव रोकडे यांनी कामकाज पाहीले. त्यांना ॲड. श्रीकांत गवळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## आशाबाई कटारिया यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पारनेर येथील रहिवासी आशाबाई रमणलाल कटारिया (वय ६५) यांचे २२ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पारनेर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

कापड व्यापारी बाबुलाल भिकनदास कटारियाचे संचालक संतोष कटारिया यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## अक्षय कोठावळे याचे निधन



नगर - नागलवाडी (ता. कर्जत) येथील रहिवाशी अक्षय अंबादास कोठावळे (वय २२) याचे २१ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्याच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्याच्या पश्चात आई-वडील, आजी-आजोबा, चुलते-चुलत्या, चुलत भाऊ असा परिवार आहे.

## अनिल बिज्ञा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - तोफखाना भागातील रहिवाशी अनिल चंद्रकांत बिज्ञा (वय ५५) यांचे २२ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

अहमदनगर पद्मशाली वधू-वर मंडळाचे ते मार्गदर्शक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## श्रीकुमार गाबरा यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - इंदिरा कॉलनी, तारकपूर येथील रहिवासी श्रीकुमार गोबिंदराम गाबरा (कुमार सर, वय ७४) यांचे २२ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुले, २ सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शिक्षक भारती २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर

नगर - महाराष्ट्र राज्य सरकारी-निमसरकारी कर्मचारी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने शासनाकडे दीर्घकाळ प्रलंबित असलेली जुनी पेन्शन योजना मंजूर करावी, सर्व शाळांना १००% अनुदान तात्काळ प्राप्त व्हावे, कर्मचारी भरती तात्काळ व्हावी यासह विविध मागण्यासाठी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. मात्र शासनाकडून याबाबत सतत दुर्लक्ष होत असल्याने शासनाला निर्वाणीचा इशारा म्हणून २९ ऑगस्ट पासून बेमुदत संप करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनिल गाडगे यांनी दिली.

शिक्षक भारती संघटना राज्य कर्मचारी समन्वय समितीची प्रमुख घटक असल्याने, शिक्षक भारतीच्या राज्य कार्यकारिणीच्या १७ ऑगस्टच्या राज्यकार्यकारिणी बैठकीत या संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. मार्च २०२३ मध्ये राज्य शासनाने, १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षक यांच्या ७ दिवसांच्या संपात न भूतो न भविष्यती उद्रेक अनुभवला आहे. या प्रखर असणाऱ्या आंदोलनाचा सकारात्मक विचार करुन, राज्य शासनाने कर्मचारी शिक्षकांच्या समन्वय समितीसह दिर्घ चर्चा केली. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्र्यांनी जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल अशी लेखी हमी दिली. त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत त्याबाबत कोणतीच सकारात्मक प्रगतीशील कार्यवाही दिसून न आल्यामुळे कर्मचारी-शिक्षकांनी पुन्हा १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. आजपर्यंत शासनाने कोणत्याही स्वरुपात सुधारित पेन्शन संदर्भातील शासन निर्णय किंवा अधिसूचना अद्याप पारित केलेली नाही. त्यामुळे राज्यातील कर्मचारी-शिक्षक संतप्त झाले आहेत. सुधारित पेन्शनच्या भवितव्याबाबत ते चिंतित झाले आहेत. तसेच केंद्राप्रमाणे ग्रॅच्युईटी द्या, १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतन/अंशदायीकरण पुनर्स्थापना करा, केंद्राप्रमाणे १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात/अधिसूचना व्दारे नियुक्ती प्रक्रिया सुरु झालेल्या कर्मचारी/शिक्षकांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा, विविध संवर्गातील रिक्त असलेली ४० टक्के पदे कायमस्वरुपी नियुक्तीव्दारे भरा, विना अट अनुकंपा तत्वावर नियुक्त्या द्या, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, शैक्षणिक विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष चर्चासत्र आयोजित करा, नवीन शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना न्याय द्या अशा प्रलंबित मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर चर्चासत्र आयोजित करुन, शासन निर्णय पारित केले जातील असे निसंदिग्ध आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते. या आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता तर लावल्या नाहीत ना ? अशी भावना सर्वदूर महाराष्ट्रातील कर्मचारी शिक्षकांच्या मनात उत्पन्न झाली आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १०० टक्के संपात सहभागी व्हावे, असे आवाहन सुनिल गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, सोमनाथ बोंतले, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, कैलास जाधव, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या अध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी केले आहे.

## माऊली सभागृहात २४ ऑगस्टला 'हिटस् ऑफ लक्ष्मीकांत प्यारेलाल'

नगर - ऑर्केस्ट्रा कादंबरी तर्फे 'हिटस् ऑफ लक्ष्मीकांत प्यारेलाल' या संगीत मैफलीचे २४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वा. माऊली सभागृह, सावेडी, अ.नगर या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात गायक वाजीद खान, टीव्ही स्टार कोमल धांडे तसेच देवदत्त पाऊलबुधे, जुबेर शेख, प्रीती पवार, डॉ. दमन काशिद, फरहीन सय्यद, कादंबरी काव्यांजली आणि उद्योजक - गायक अविनाश कांबळे हे लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीतबद्ध केलेल्या सुमधुर गितांचे गायन करणार आहेत.

त्याचप्रमाणे गौतम गुजर, दिलावर शेख यांच्या संगीत संयोजनाखाली श्रीकांत गडकरी, संजय आठवले, अमित बरुआ, ॲडविन पेरेपाडम, फरहान शेख, विशाल बोर्डे, नरेन साळवे, सिद्धार्थ थत्ते, अमित साळवे, अंकित खरारे, सचिन वाघमारे हे वाद्यकाम करणार आहेत.

प्रवेशिकांसाठी संपर्क - ९८६०२८८३७३, ९९२११७९६३९, ८४५९१६५४५९.

# खुल्या कारागृहातून पळालेला कैदी पोलिसांनी पाठलाग करून पकडला

## रेल्वेने पसार होण्यापूर्वीच आवळल्या मुसक्या; गुन्हा दाखल

नगर - श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर येथील खुल्या कारागृहातून एका कैद्याने बुधवारी (दि.२१) दुपारी कारागृहात तैनात जेल पोलिसांची नजर चुकवून पलायन केले. मात्र ही बाब काही वेळातच कारागृह प्रशासनाच्या लक्षात आल्याने या पळालेल्या कैद्याला पाठलाग करत विसापूर रेल्वे स्थानकावर पकडण्यात पोलिसांना यश आले.

विसापूर खुल्या कारागृहात मोहंमद अमीर शेख (रा. सदर बाजार, प्रतापगड, उत्तरप्रदेश) हा बंदी क्र. ६०१ कैदेत आहे. त्याने बुधवारी (दि.२१) दुपारी ३.५५ च्या सुमारास कारागृहात तैनात जेल पोलिसांची नजर चुकवून पलायन केले. मात्र ही बाब काही वेळातच कारागृह प्रशासनाच्या लक्षात आली. कारागृह अधीक्षकांना याची माहिती देण्यात आली. त्यांनी तातडीने पळालेल्या कैद्याच्या शोधासाठी पोलिस कर्मचारी रवाना केले.

कर्मचाऱ्यांच्या एका पथकाला तो रेल्वे स्टेशनच्या दिशेने गेला असल्याचे समजले. त्यांनी तातडीने रेल्वेस्टेशन कडे धाव घेत पाठलाग करून त्याला पकडले. थोडा उशीर झाला असता तर सदर कैदी हा रेल्वे गाडीत बसून पसार झाला असता. त्याला पकडल्यानंतर त्याच्या विरुद्ध पोलिस कर्मचारी किसन बिरलींगे यांनी बेलवंडी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी बी.एन.एस. २०२३ चे कलम २६२ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## नगर शहर मतदारसंघातील यादीमधील दुबार व मयत व्यक्तींची नावे कमी करावीत



संभाजी कदम

नगर - २२५ नगर शहर विधानसभा, अहमदनगर या विभागातील मतदार यादीमध्ये दुबार २४,१३७ संख्येचे नावे तसेच मयत व्यक्तींची नावे अस्तित्वात आहेत. नगर शहर विधानसभेच्या यादीमध्ये शोध घेतला असता दुबार नावे आढळून आलेले आहेत सदरची नावे मतदार यादीमध्ये आहे त्या स्थितीत राहिल्यास या नावावर बोगस मतदान होण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही. तसेच नगर शहर व शेजारी असलेला विधानसभा २२३ राहुरी व विधानसभा २२६ श्रीगोंदा मतदारसंघ यालगत असून या भागातील मतदारांची नावे नगर शहर २२५, २२३ राहुरी-नगर, २२६ श्रीगोंदा-नगर व २२४ पारनेर-नगर विधानसभा या मतदार यादीत समाविष्ट आहे व सदर मतदारांची दुबार नावे तसेच मयत लोकांची नावे हे राजकारणी लोकांनी काही अधिकाऱ्यांना हाताशी धरुन जाणुन-बुजुन आपल्या बाजुने मतदान होण्याकरीता आहे तशीच ठेवलेली आहे ती कमी होणे आवश्यक आहे. २२५ विधानसभा मतदार संघाची मतदार यादी ही सदोष होणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. या मागणीचे निवेदन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम यांनी नाशिक विभागीय आयुक्त डॉ.प्रविण गेडाम यांना देवुन त्यांच्याशी चर्चा केली.

सदर निवडणुक आयोगाने निवडलेले बी.एल.ओ. (B.L.O.) अधिकारी यांना हाताशी धरुन राजकीय फायद्यासाठी दुबार मतदार व मयत मतदार यांची नावे मतदार यादीत ठेवून त्यांना हाताशी धरुन बोगस मतदान करण्याचा हेतु आहे. बी.एल.ओ. हे ज्या मतदान केंद्रात राहतात त्या ठिकाणी मतदान केंद्र वगळून त्यांना दुसरे मतदान केंद्र देण्यात यावे जेणेकरुन राजकीय फायदयासाठी बोगस मतदान होणार नाही. सदर बी.एल.ओ. अधिकारी यांनी राजकारणाला बळी न पडता मतदान यादी सदोष करण्यास दुबार नावे व मयत नावे कमी करण्याची कार्यवाही करावी, अशी ही मागणी त्यांनी केली.

निवडणुक आयोगाच्या सुचनेप्रमाणे १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांना मतदार यादीत समाविष्ठ करण्यात येते. परंतु दरम्यानच्या काळात १८ वर्षापेक्षा कमी असलेले काही मतदार यांचे नावाच्या दाखल्यामध्ये खाडाखोड करुन फेरफार करुन वय वर्षे वाढविल्याबाबत दर्शवुन त्यांना १८ वर्षांचे पुढे दाखवुन त्यांची मतदार यादीत नावे समाविष्ठ केल्याचे दिसून येत आहे याबाबत चौकशी करुन संबंधित मतदारांची आधारकार्ड, पासपोर्ट इ. शासनमान्य ओळखपत्रांचा तपशिल तपासून त्याबाबत योग्य ती चौकशी व कार्यवाही करुन त्यांची नावे त्वरीत कमी करण्यात यावी. तसा अहवाल आपल्या कार्यालयाकडून ३० दिवसाच्या आत देण्यात यावा, तसे न झाल्यास संबंधित अर्जदार हे याबाबत न्यायालयकडे दाद मागतील, असे संभाजी कदम यांनी सांगितले.

# गृहिणी

## आरोग्य

### सकाळी ध्यान करा

बरेचसे योगी सकाळी ध्यान करायला कधीही विसरत नाही, त्यांचे असे म्हणणे आहे की ध्यान केल्याने मानसिक व्याधींना दूर करण्यास मदत मिळेल आणि यामुळे आपल्या दिवसभराच्या क्रियेसाठी एक हेतू निश्चित केला जाऊ शकतो. रात्री झोपण्यापूर्वी गजर लावावा आणि सकाळी सूर्योदयाच्या पूर्वी उठावे. असे केल्याने आपण स्वतःसाठी पुरेसा वेळ देऊ शकाल आणि आयुर्वेदानुसार आपले संपूर्ण दिवस ऊर्जेने भरलेले राहील.

## पाककला

### सोयाबीन करी

**साहित्य** – सोयाबीन वडी– २ वाट्या, किसलेले सुके खोबरे १ वाटी, उभा चिरलेला कांदा १ मोठा, लसूण पाकळ्या १५–२०, मिरी दाणे ५–६, लवंगा ५–६, आले मध्यम तुकडा, कोथिंबीर १–२ वाटी, लाल तिखट चवीनुसार, मीठ चवीनुसार.

**कृती** – सर्वप्रथम एका सोयाबीनचे दोन तुकडे असे सर्व तुकडे करून घ्यावे. कढईमध्ये अर्धा चमचा तेल घालून किसलेले खोबरे, आले, लसूण, कांदा, लवंगा, मिरे भाजून घ्यावे. खोबऱ्याचा रंग बदलला की गॅस बंद करून सर्व जिन्नस वाटून घ्यावे.

कढईमध्ये तेल घालून त्यात थोडी साखर घालावी. साखर घातल्याने तेलाचा छान तवंग येतो. नंतर त्यात लाल तिखट आवडीनुसार घालावे. हा रस्सा जरा झणझणीतच चांगला लागतो. तेल तापल्यावर त्यात वाटलेली पेस्ट घालून चांगले परतावे. खोबरे तेल सुटेपर्यंत परतावे. नंतर त्यात तुकडे केलेले सोयाबीन घालून थोडे परतावे. उकळलेले पाणी घालून सोयाबीन शिजू द्यावे. चवीनुसार मीठ घालावे. शिजल्यावर वरून कोथिंबीर घालावी. गरम गरम भाकरीबरोबर वाढावे. सोबत कांदा चिरून द्यावा.

## वास्तू

### वास्तुशांतीसाठी शुभ नक्षत्र आणि शुभ मुहूर्त

शुभ वार–सोमवार, बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार शुभ आहेत. शुभ तिथी–शुक्ल पक्षातील द्वितीया, तृतीया, पंचमी, सप्तमी, दशमी, एकादशी, द्वादशी आणि त्रयोदशी. शुभ नक्षत्र–अश्विनी, पुनर्वसू, पुष्य, हस्त, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपद, रोहिणी, रेवती, स्वाती, अनुराधा, मघा, धनिष्ठा.

## सौंदर्य

उन्हात जाण्यापूर्वी डोळ्यांवर आय प्रोटेक्टिव्ह क्रीम व गॉगल लावा.

## सल्ला

चिवडा करताना पोहे किंवा मुरमुरे दोन तास तरी उन्हात किंवा दोन मिनिटे ओव्हन मध्ये ठेवावेत म्हणजे साधळत नाहीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २३ ऑगस्ट २०२४

**–––, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, रेवती १९।५४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**वृषभ** : कौटुंबिक जीवन आपल्यासाठी आनंद आणेल, पण खाण्या–पिण्याच्या बाबतीत काळजी घ्यावी लागेल. आरोग्य नरम–गरम राहील.

**मिथुन** : नवीन कामे, योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील. घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील. आपल्या उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवाल.

**कर्क** : शत्रू पराभूत होतील. दृष्टीकोनात बदल केल्याने निश्चितच यश मिळेल. आपली कामे धाडसाने कराल.

**सिंह** : मान–सन्मान वाढेल. आनंदाची बातमी मिळेल. आरोग्याची काळजी घ्याल. कौटुंबिक वाद–विवाद टाळाल. नुकसान होण्याचा संभव आहे.

**कन्या** : व्यापार–व्यवसायात जोखमीचे काम टाळा. नोकरदार कामात व्यस्त राहातील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ** : व्यापारात वेळ मध्यम राहील. कामात काही विघ्न येऊ शकतात. अधिक जोखमीचे कार्ये टाळा.

**वृश्चिक** : अधिकाऱ्यांपासून दूर राहा. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. मित्रांचे सहकार्य मिळाल्याने महत्त्वाची कार्य पूर्ण होतील.

**धनु** : राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे. कौटुंबिक सुख वाढेल. आर्थिक विषयांमध्ये सावध रहा. कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल.

**मकर** : मागील उधारी–उसनवारी वसुल होईल. दैनंदिन कामात सातत्य राहणार नाही. अस्वस्थता जाणवेल.

**कुंभ** : व्यापार–व्यवसायात वातावरण अनुकूल मिळेल. मिळकतीपेक्षा अधिक खर्च होईल. आपले काम धाडसाने कराल. यंत्रे व उपकरणे जपून हाताळावीत.

**मीन** : पैशासंबंधी येणाऱ्या सर्व अडचणी दूर होतील. आनंदाची बातमी मिळेल. जुने मित्र –मैत्रिणी भेटतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**कंडक्टर : राजू! तुझं वय काय?**
**राजू : घरचं का बसमधलं?**
**कंडक्टर : म्हणजे?**
**राजू : मी घरी सात वर्षांचा आणि बसमध्ये चार वर्षांचा असतो.**

## फिल्मीचक्कर क्र. ११५१

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | | ■ | ४ |
| | ■ | ५ | | ■ | ■ | ६ | |
| ७ | | | ■ | ८ | ९ | ■ | |
| | ■ | ■ | १० | ■ | | ■ | |
| ११ | | | | | | १२ | |
| | ■ | ■ | | ■ | ■ | | ■ |
| | ■ | १३ | | ■ | ■ | | ■ |
| ■ | १४ | | ■ | १५ | | | ■ |

**आडवे शब्द :–** १) ++ ++ ++ घराना अनाम बहती है गंगा जहां मेरा धाम (गाणे) ५) रातों का ++ (चित्रपटाचे नाव) ६) ++ सावन (चित्रपटाचे नाव) ७) राजेश खन्ना, जयाप्रदा, राकेश रोशन, सुप्रिया पाठक, मदन पुरी, अमरीश पुरी, मॉंटी यांच्या भूमिका असलेला एक चित्रपट ८) ++ कहते हैं बडा नाम करेगा (गाणे) ११) राजेश खन्ना, योगिता बाली, हेमामालिनी, अशोककुमार, मेहमूद यांचा एक चित्रपट १३) दिलीपकुमार, नर्गिस, जीवन यात आहेत १४) रेशमा और ++ (चित्रपटाचे नाव) १५) +++ मिळे नवऱ्याला (मराठी चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :–** १) जितेंद्र, हेमामालिनी, शक्ती कपूर, परवीन बाबी, विजय अरोरा, कादरखान, रणजीत, ओम शिवपुरी यांचा एक चित्रपट २) मिथुन चक्रवर्ती, पूजा भट्ट, अतुल अग्निहोत्री यांचा एक चित्रपट ३) अब आयेगा ++ (चित्रपटाचे नाव) ४) अशोककुमार, विश्वजीत, माला सिन्हा, शशिकला, तनुजा यांचा एक चित्रपट ९) पत्थर और +++ (चित्रपटाचे नाव) १०) मिथुन चक्रवर्ती, काश्मिरा शाह, ओम पुरी यांचा एक चित्रपट १२) धर्मेंद्र, रती अग्निहोत्री, पद्मिनी कोल्हापुरे, गोविंदा यांचा एक चित्रपट १३) मै और ++ हाथी (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : माता म्हणजे मनुष्याच्या जीवनातील गंगाजळ आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जलसंजीवनी म्हणजे काय?

'हगवणीवर बहुगुणी, मीठ–साखर–पाणी'' किंवा ''जुलाबावर वापरा जलसंजीवनी'' अशी वाक्ये तुम्ही अनेकदा ऐकली असतील किंवा वाचली असतील. हगवणीसारख्या सामान्य वाटणाऱ्या आजारामुळे आपल्या देशात दरवर्षी ५ वर्षांखालची ५ लाख मुले मरतात; हे वाचल्यावर तुम्हाला आश्चर्य वाटेलच, पण वाईटही वाटेल. मुख्य म्हणजे हे मृत्यू सहज टाळता येणारे असतात. हगवणीची अनेक कारणे असली तरी मृत्यू येण्याचे कारण निर्जलीकरण हेच असते. प्रौढ व्यक्तीच्या शरीरात सुमारे ६३% तर शिशूंच्या शरीरात ७०% पाणीच असते. हगवणीमध्ये शरीरातील पाणी व क्षार शरीरातून बाहेर गेल्यामुळे जीभ कोरडी पडते, टाळू खोल जातो, खूप तहान लागते, लघवी होत नाही, वजन कमी होते, नाडीचे ठोके वाढतात, डोळे खोल जातात व उपचार न झाल्यास मृत्यूही औढवतो.

निर्जलाकरणावर उपचार केल्यास हे मृत्यू सहज टाळता येतील. यासाठी अनेक उपाय उपलब्ध आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हगवण झालेल्या मुलाला दूध, पाणी, सरबत, खीर, चहा, कॉफी असे पदार्थ देत राहावे. हगवण झाली आहे म्हणून वरचे पदार्थ व पाणी द्यायचे नाही, ही अत्यंत चुकीची पद्धत आहे व प्रसंगी ती जीवघेणी ठरू शकते. शरीरातील पाण्याचे व क्षाराचे प्रमाण सामान्य पातळीवर आणण्यासाठी बाजारात जलसंजीवनीची पाकीटे मिळतात. यात ३.५ ग्रॅम सोडियम क्लोराईड (मीठ), २.५ ग्रॅम सोडियम बायकार्बोनेट (खायचा सोडा), १.५ ग्रॅम पोटॅशियम क्लोराईड व २० ग्रॅम ग्लुकोज असते. हे पाकीट उकळून गार केलेल्या १ लिटर पाण्यामध्ये मिसळून बाळाला पाजावे. जितक्या वेळा बालक प्यायला मागेल तितक्या वेळा व पाहिजे तितके प्यायला द्यावे. बाजारातून हे पाकीट न आणता घरच्या घरीही हे बनवता येते. यात १ लिटर उकळून गार केलेल्या पाण्यात मूठभर साखर व तीन बोटांच्या चिमटीइतके मीठ टाकावे. असल्यास चिमूटभर खायचा सोडा व चवीसाठी लिंबाचा रस टाकावा. हे द्रावण हगवण झालेल्या बाळास वारंवार पाजल्यास ते बरे होते व त्याचा मृत्यू टाळता येतो. मीठ–साखर–पाण्यामुळे लाखो मुलांचे प्राण वाचत आहेत. गरज आहे ती फक्त सजलीकरणाचे महत्त्व समजून घेण्याची व इतरांपर्यंत ते पोहोचवण्याची.

### तडजोड

उन्हाळा फार कडक पडला होता. अरण्यात कुठे पाण्याचा टिपूस नजरेस पडत नव्हता. अशा वेळी पाण्याच्या शोधात फिरत– फिरत एका डबक्याजवळ सिंह आणि रानडुक्कर एकाच वेळी आले. प्रथम कोण पाणी पिणार, यावरुन दोघांचे भांडण जुंपले. कोणीच कोणाचे ऐकेना. शेवटी ते एकमेकांच्या अंगावर धावून जात एकमेकांना रक्तबंबाळ करु लागले. मग थकून थोडा वेळ विश्रांती घ्यावी, म्हणून ते थांबले असता, ''येथे कोणाचा तरी मुडदा पडेल आणि त्यावर आपल्याला ताव मारता येईल'' असे वाटून आकाशात गिधाडे घिरट्या घालू लागली.

''आकाशात घिरट्या घालणारी गिधाडे पाहताच व त्याचे मर्म लक्षात येताच रानडुक्कर सिंहाला म्हणाले,

''अरे आपण असेच एकमेकांशी भांडून एकमेकांना ठार करावं आणि या क्षुद्र गिधाडांनी आपल्या मांसाचे तुकडे तोडावेत, यापेक्षा दुर्दैव ते कोणतं? त्यापेक्षा हे भांडण मिटलेले बरं.''

हे म्हणणं सिंहालाही पटलं, तेव्हा रानडुक्कर म्हणाले, ''मग सिंह महाराज, तुम्हीच पाणी प्या प्रथम.''

तेव्हा सिंह म्हणाला, ''नको, तूच पी.''

यावर रानडुक्कर म्हणाले, ''नाही महाराज, तुम्ही माझ्यापेक्षा मोठे म्हणून तुमचाच मान प्रथम. आता प्या पाणी.''

**तात्पर्य** : तडजोड करुन भांडण मिटविले, तर नुकसान होत नाही.

## जीवन चक्र



मी संत कृपालसिंहजींचे दर्शन सर्वात प्रथम सन १९६८ मध्ये एका सत्संगाच्या सयमाने घेतले. याआधी मी रिद्धी सिद्धी साधना करीत असे. ही साधना करतांना मला माहित होत असे की फलान्या फलान्या ठिकाणी धन गाडलेले आहे. मी ते धन काढून गरीबांच्या सेवेमध्ये लावत असे. यासाठी कधीही कोणाकडूनही पैसे घेत नसे. १९७४ मध्ये महाराजांनी शरीर सोडल्यानंतर मी पुन्हा रिध्दी सिद्धी साधनेत पडलो. मी वॉटर

कवर पंप ऑपरेटर च्या पदावर आरबीआय यांच्यातर्फे नियुक्त होतो. एकदा मी दरूस्तीच्या कामासाठी टँकवर चढत होतो. तेवढ्यात टँकवरून माझा पाय घसरला. मी जसा खाली कोसळत होतो तेव्हा एकदम दोन हात प्रकट झाले व मला हातांवर धरले आणि मला खाली जमिनीवर उभे केले. मी बघतच राहिलो की माझी रिद्धी सिद्धी कोठे गेली. तेव्हा माझ्या सहकार्यांनी सांगितले की तुला स्वतः संत कृपालसिंहजी महाराजांनी वाचविले आणि आम्हांलाही तुझ्यामुळे त्यांचे दर्शन झाले. नंतर पुन्हा सकाळी ३ वाजता मला संत कृपालसिंहजींचे प्रत्यक्ष दर्शन झाले. मी म्हणालो, महाराजजी मी धोक्यातच राहिलो. कारण की मला १९६८ पासून अजूनही नामदान मिळाले नाही आणि तुम्ही तर शरीर त्याग केले आहे. त्यांनी मला पितापूत'' पुस्तक वाचण्यासाठी सांगितले. मी पुस्तकामध्ये पाच शब्दांचे वर्णन वाचले, तेव्हा महाराजांना म्हणालो, मला नामदान मिळाले नाही. ते म्हणाले, 'तू टिळक नगरला जा. तेथे संत दर्शनसिंहजी तुला नामदान देतील. मी टिळकनगरला पोहचलो आणि तिथेच एक दिवस मला महाराज दर्शनसिंहजींकडून नामदान मिळाले. मला तिथे विशेष अनुभव आला. महाराजांनी मला वेगळे बसवले आणि माझ्यावर विशेष कृपा केली. माझी एक मुलगी १३ महिन्यांची होती. तिच्या खांद्यावर गरम दुध सांडले होते. तिला दवाखान्यात ॲडमिट केले. जेव्हा मुलीला आराम मिळाला नाही तेव्हा तिचे ऑपरेशन करावे लागले. ऑपरेशन थेटरच्या डॉक्टरांनी महाराजांच्या उपस्थितीबद्दल सांगितले. डॉक्टरांनी जेव्हा विचारले की हे सरदार आतमध्ये कसे आले तेव्हा मी फोटो दाखवला. तेव्हा ते म्हणाले, हा हेच होते मी म्हणालो की हे तर नेहमी आमच्या अगसंग राहतात. ही २१ जानेवारी १९७७ ची घटना आहे. माझ्या पत्नीने दवाखान्यात प्रार्थना केली की जर तू परमात्मा आहेस तर १० मिनिटांमध्ये मला येथेच शरीररुपामध्ये दर्शन दे. ''महाराज १० मिनिटांच्या आत तेथे पोहचले आणि माझ्या पत्नीला विचारले, ''बोल काय आहे?'' ती क्षम ायाचना करीत म्हणाली, ''माझी मुलगी तर दुधही पित नाही.'' महाराजांनी त्या मुलीला मोहिनी नावाने हाक मारली. तेव्हा १३ महिन्यांची मुलगी बोलली की ''हा महाराजजी!'' मुलीने आईचे दूध पिले. माझी पत्नी दुसऱ्या मुलांना बघण्यासाठी घरी आली.

रात्री ११ वाजता मुलगी मृत्यू पावली. मला शंका आली की मुलीला काळाने नेले असेल तेव्हा दयाल पुरुष संत दर्शनसिंहजी महाराजांनी मला अंतरी दर्शन दिले आणि दिलासा दिला. मी बघितले की माझी मुलगी महाराजांच्या चरणी आहे आणि मी हे बघून संतुष्ट झालो.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

वो रोज़ सेन्टर पर आने लगा और तीन साल के बाद उसके जीवन में बहुत कुछ परिवर्तन आया। वह ठीक–ठाक कपड़े पहनने लगा, दूसरों के साथ अच्छी तरह व्यवहार करने लगा और अपने बाप के साथ दुकान पर भी जाने लगा।

भाई साहब की बहुत शुभ भावना और कल्याण की भावना होती थी कि बाबा के ज्ञान से सबका कल्याण हो जाये। वे कहते थे, बाबा का ज्ञान इतना श्रेष्ठ है, उसे सबको सुनाओ, उनका जीवन बनाओ।

**योग का प्रयोग करना**

एक बार भाई साहब ने हम बहनों को कहा कि सेन्टर के ऊपर बोर्ड लगाया हुआ है ना 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' इसे दृष्टि दो और संकल्प करो कि बाबा, जितने भी लोग ज्ञान छोड़कर गये वे आज और कल इन दो दिनों में आपके सेन्टर पर आ जायें। भले ही मिलकर जायें लेकिन आयें ज़रूर। हम सब बहनें योग में बैठ गयीं। यह मेरे लिए एक नया अनुभव था। सब बहने लक्ष्य लेकर सुबह १०.३० बजे से दिन के १२.३० बजे तक योग में बैठ बोर्ड को दृष्टि देती रही और ज्ञान छोड़कर गये हम लोगों का का आव्हान करती रही। दो दिन के अन्दर १५–२० वे लोग सेन्टर पर आ गये जो पहले आते थे। उनमें वो भी थे जो मेरे से पहले सेन्टर पर आते थे। जब मैंने उनसे पूछा, आप कहाँ से आये हो तो कहा, हम तो आप से पहले ही आते थे। मैं यह दृश्य देख करके हैरान हो गयी कि योग में इतनी शक्ति है! जाने एक बार की बात है, सेन्टर पर १८ जनवरी के निमित्त पब्लिक प्रोग्राम चल रहा था १७ जनवरी के दिन उसमें एक माता आयी हुई थी। भाई साहब यज्ञ–कहानी सुना रहे थे। सुनते–सुनते वह माता बहुत रोने लगी। मैंने पूछा, आप क्यों रो रही हो? उसने कहा, यहाँ जो यज्ञ–कहानी सुना रहे हैं ना, उस ॐ–मंडली में मैं भी थी। मुझे एक मिनट के लिए भाई साहब से मिलवा दो। भाई साहब उस माता से मिले और बहुत प्यार से उसको स्टेज तक ले गये। उस माता ने कहा, बेगरी पार्ट के समय मैंने ज्ञान छोड़ दिया था और शादी कर ली थी। मैं रूप नगर में रहती हूँ। मेरे साथ उस समय जो क्लास में आती थीं वे सब दादियाँ बन गयीं, मैं अपने बच्चों की दादी बन गयी। इस तरह भाई साहब सबको सम्मान देते थे।

**उनकी दिनचर्या**

अगर उनका टाइम टेबल ज़्यादा टाइट नहीं होता, सामान्य रूप से होता तो वे सबह ३.०० बजे उठते थे। साढ़े तीन से साढ़े चार बजे तक नीचे क्लास हॉल में योग करने आते थे। लाल बत्ती खुद ही करते थे हॉल में। क्लास हॉल शक्ति नगर में ग्राउण्ड फ्लोर पर था। अगर भाई साहब का योग कराने का टर्न होता था तो वे सामने बैठकर योग कराते थे। एक–एक दिन सब का टर्न होता था। योग कराते समय उनके सामने हम सब चन्द्रमा के आकार में बैठते थे। योग कराने वे संदली पर बैठते थे। उस समय टेप नहीं बजती थी। योग के बाद ४.३० बजे कोई बहन जिसकी ड्यूटी लगी हुई होती थी, वो चाय लेकर जाती थी और उनको मुरली सुनाकर आती थी। पाँच से साढ़े पाँच बजे उनका स्नान का समय होता था। पौने छह या छह बजे कोई बहन दूध और पाँच बादाम लेकर जाती थी।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**उपाययोजना** : सकाळी उठल्यावर गर्भवतीने पातळ पदार्थ उदा. टाळावे. उठल्यावर सुरुवातीला कोरडेच पदार्थ खावेत. उदा. बिस्को किंवा प्लेटभर शिरा किंवा ड्रायफ्रूटस् असे खावे, कारण रात्रभर पोटात काही गेल्यामुळे पित्त साचलेले असते व सकाळी उठल्यावर पातळ पदार्थ घेण्यात रात्रभर साचलेले पित्त व घेतलेला पातळ पदार्थ उलटीतून बाहेर पडते; म्हणून द्रवपदार्थ घेण्याचे टाळावे. त्याऐवजी कोरडे पदार्थ खावेत. कोरडे पदार्थ रात्रभर साचलेले पित्त तो पदार्थ पचविण्याचे काम करते व त्यामुळे उलटी होत ना एकदम पोटभर जेवण्यापेक्षा थोड्याथोड्या अंतराने खात राहावे व खाल्ल्यानंतर अर्धा तास तरी झोपून राहावे. यामुळे उलटी होण्याची संभावना कमी होते.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना** : लवंग, वेलदोडा, आवळा सुपारी. आवळा कॅण्डी जेष्ठमधाचा तुकडा, खडीसाखर या पदार्थांनी तोंडातील कडूपणा कमी होतो. मक्याचा लाह्या, मुरमुरे, फुटाणे या हलक्याशा पदार्थांनी देखील गर्भवतीची मळमळ कमी होते गुलकंद आणि लोणी यांचे एकत्र समान विभाग करून २–२ चमचे सकाळ–दुपार–संध्याकाळ चाटण करावे. यामुळे उलटीची भावना कमी होते व गर्भवतींना बल मिळते. त्याचबरोबर डाळिंबाचा रस प्यावा किंवा डाळिंब खावे. एवढे प्रयत्न करूनही जर त्रास होत असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करावेत.

**छातीत व पोटात जळजळणे** : हा त्रास साधारणतः झोपलेल्या अवस्थेत जास्त जाणवतो. तसेच शेवटच्या महिन्यांमध्ये जाणवतो, कारण गर्भाशयाची उंची वाढल्याने त्याचा दाब आमाशय (Stomach) वर पडतो; त्यामुळे जेवलेल्या अन्नाचे नीट पचन होत नाही. त्या कारणाने पोट गच्च होणे, पोटात गुब्बारा धरणे, छातीत जळजळ ही लक्षणे जाणवतात.

**उपाययोजना** : हा त्रास होऊ नये म्हणून जास्त मसालेदार पदार्थ, मांसाहारी पदार्थ खाऊ नयेत व थंड दूध प्यावे. गायीचे शुद्ध तूप जेवणात घ्यावे.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना** : आवळा सरबत, मोरावळा, दुर्वांकुर च्यवनप्राश तसेच जेवणानंतर आमपाचक वटी घ्यावी. अविपत्तिकर चूर्ण १–१ चमचा शहाळ्याच पाण्यासोबत किंवा साध्या पाण्यासोबत घ्यावे: तसेच पित्ताचा जास्त त्रास होत असल्यान सुवर्णशेखर रस, कापदुधवटी यांचा वापर करावा. शहाळ्याचे पाणी सकाळी १ ग्लास व संध्याकाळी १ ग्लास घेतले तरी पित्ताची लक्षणे कमी होतात. एवढे करूनही त्रास होत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत.

**३. मलावस्तंभ** (Constipation) : गर्भावस्थे मध्ये मलाशयावर गर्भाशयाचा दाब पडल्याने मलावस्तंभाचा त्रास बऱ्याच गर्भवतींना जाणवतो. त्याच प्रमाणे गर्भावस्थेत शारीरिक हालचाल कमी होते. गर्भवतीचे शरीरातील हॉर्मोन्सचे प्रमाण कमी–जास्त होत असते. तसेच गर्भावस्थेत घेत असलेल्या रक्तवाढीच्या औषधांमुळे सदा मलावस्तंभाचा त्रास होत असतो. एवढे करूनही मलावस्तंभाचा त्रास होत असेल, तर रात्री झोपताना एक चमचा त्रिफळाचूर्ण ज्येष्ठमधासोबत कोमट पाण्यातून घ्यावे. (क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# नगर शहराच्या शाश्वत विकासासाठी २५ वर्षांचे नियोजन करून रस्त्यांची निर्मिती होत आहे

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; नगर शहरात सुरू असलेल्या रस्ता काँक्रिटीकरण कामाची केली पाहणी

नगर - अहमदनगर महापालिकेच्यावतीने राज्यस्तरीय नगर उत्थान महाअभियान योजनेतून आपण शहरांमधील प्रमुख २४ रस्त्यांची कामे हाती घेतली असून, या कामातील सिमेंट काँक्रीटचा दर्जा हा M-40 ग्रेडचा असून शहरातील ५ काँक्रिटीकरण रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे ती प्रगतीपथावर आहे. यामध्ये माऊली संकुल ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंत तसेच लालटाकी ते दिल्लीगेट आणि बागरोजा हडकोपर्यंत रस्त्याच्या कामाची पाहणी केली. या सर्व रस्त्यांची डिझाईन चिफ इंजिनिअर मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी प्रमाणित केले असून त्याला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. नगर शहराचा शाश्वत विकास व्हावा यासाठी पुढील २० ते २५ वर्षाचे नियोजन करून दर्जेदार व कायम स्वरूपीच्या रस्त्याची निर्मिती होत आहे. रस्त्यांची कामे सुरू केले असल्यामुळे वाहतूक वळविण्यात आली असून काही प्रमाणात नागरिकांची गैरसोय होत आहे, तसेच खोदकामामुळे ड्रेनेज व पाणी लाईन फुटल्यामुळे देखील त्रास होत असेल यासाठी तातडीने दुरुस्ती करून पूर्ववत करण्याच्या सूचना यावेळी दिल्या आहे. आता थोडाफार त्रास होत असेल मात्र आपण सर्वजण मिळून पुढच्या नगरच्या भविष्यासाठी काम करूया, यासाठी नगरकरांनी सहकार्य करावे, असे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.


रस्ता काँक्रिटीकरण कामाची पाहणी करताना आयुक्त यशवंत डांगे. (छाया - लहू दळवी)

नगर शहरात सुरू असलेल्या रस्ता काँक्रिटीकरण कामाची आयुक्त यशवंत डांगे यांनी पाहणी केली. यावेळी शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनियर श्रीकांत निंबाळकर आदींसह अधिकारी, ठेकेदार, कर्मचारी उपस्थित होते.

मनपा आयुक्त यशवंत डांगे दररोज सकाळी नगर शहरामध्ये दैनंदिन कामाची पाहणी करत असताना कुष्ठधाम नाल्याजवळ उघड्यावर कचरा टाकण्यासाठी आलेल्या नागरिकांना स्वच्छतेबाबत खडेबोल सुनावत सावेडी डेपोत कचरा टाकण्यास भाग पाडले, तसेच गजराज फॅक्टरी समोर विनापरवाना बांधकाम चालू असल्याचे आढळले त्या ठिकाणी फॅब्रिकेटरचे साहित्य जप्त करून महापालिकेने कारवाई केली, याचबरोबर कुष्ठधाम रोडवरील नाल्याची झालेली दुरावस्था बघून त्वरित साफसफाई करण्याचे आदेश विभागाला दिले. अशा धडाकेबाज कारवाईच्या माध्यमातून आयुक्त यशवंत डांगे शहराची प्रतिमा सुधारण्याचे काम जोमाने करत आहे.



### मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्रावण सोमवार निमित्त अन्नदान

मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्रावण सोमवार निमित्त बालघर प्रकल्प, तपोवन रोड, नगर येथे फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी ईश्वर पवार, स्वामी टाकळकर, शुभम टाकळकर, सागर शर्मा, अतिश शिंगरे, अंकुश गोयल आदी.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांच्या प्रचार, प्रसारासाठी तालुकानिहाय मेळाव्याचे आयोजन

नगर - इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी तालुकानिहाय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक राधाकिसन देवढे यांनी दिली आहे.

२३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अहमदनगर, पारनेर, जामखेड, कर्जत व श्रीगोंदा येथील पंचायत समिती सभागृहात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

२७ ऑगस्ट रोजी शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, व श्रीरामपुर येथील पंचायत समिती सभागृहात तर ३० ऑगस्ट रोजी संगमनेर, अकोले, कोपरगाव व राहाता येथील पंचायत समिती सभागृहात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.


मुकुंदनगरच्या डॉ. जाकिर हुसेन शाळेत स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# मुकुंदनगरच्या डॉ. जाकिर हुसेन शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा

नगर - मुकुंदनगर येथील डॉ. जाकिर हुसेन मराठी प्राथमिक शाळा व म. अल्ताफ इब्राहिम माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. तर स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिक व महापुरुषांच्या वेशभुषेत आलेल्या चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

प्रारंभी ध्वजारोहण करण्यात आले. डॉ. इम्रान शेख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या संचालिका डॉ. अस्मा शाहिद काझी, प्राथमिकचे मुख्याध्यापक समीउल्ला शेख, माध्यमिकचे मुख्याध्यापक एजाज शेख आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. विद्यार्थ्यांची देशभक्तीवर भाषणे झाली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगितले.

डॉ.इम्रान शेख यांनी अल्पसंख्यांक समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. विविध सांस्कृतिक व देशभक्तीवर घेण्यात आलेल्या उपक्रमांनी शाळेत स्वातंत्र्य दिवस साजरा झाला.

# सिंधी समाजातर्फे पुणे (पिंपरी), रायपूर, नाशिक, नागपूर येथे वधू-वर परिचय संमेलनाचे आयोजन

नगर - सामाजिक संस्था एक पहल और मॅरेज ब्युरो व जव्हर नगर सिंधी पंचायतीच्यावतीने रायपूर (छत्तीसगड) येथे ८ सप्टेंबर रोजी वर-वधु परिचय संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. (मुलांची एंट्री फुल झाली आहे.)

सिंधी प्रोगेस मेटरीमोनियम ऑर्गनायजेशन पिंपरी, पुणे येथे हे संमेलन १ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायं. ४ वाजेपर्यंत होणार आहे. फॉर्म भरण्याची अंतिम तारिख २६ ऑगस्ट आहे. बी.टी आडवाणी हॉल, पिंपरी पुणे, जवाहर कोटवानी - ९८२२५६२००५, श्रीचंद्र नागराणी ९८२२३२६८१८, कुमार मोटवानी-९८२३०१६४२५, टेहेल चुगानी - ९८२३६६८८७८, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) -८९९९८१२४०८ यांच्याशी संपर्क साधावा.

'नाशिक प्यारा परिवार सोशल फाऊंडेशन' तर्फे ग्रुपच्या हिशोबाने वर- वधु परिचयाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी किशोर कंत्रोड, महेश नागपाल, शाम मोटवानी यांच्याशी संपर्क करावा.

नागपूर सिंधी सोशल फार्म व समाज आश्रमतर्फे पोस्ट ग्रॅज्युएट मुला-मुलींसाठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी मोहन मंजानी, शंकर रंगलानी, किशोर कंत्रोड, दिलीप सावलानी यांच्याशी संपर्क करावा.

आजच्या नवयुगात प्रत्येकाला आपल्या योग्य जीवनसाथीची निवड करता यावी योग्य माहिती मिळावी. संयोजकांच्यावतीने विनंती करण्यात येते की, ज्यांना परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्यासोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्याशिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही.

अधिक माहितीसाठी : पुणे वर्षा मोहनानी- ९०४९४६४१५१, सोलापुर मीना नगदेव ८६६८५०९०३०, नांदेड चंद्रप्रकाश लालवाणी - ९४२२१७४७५१, उल्लासनगर विनोद भारानी- ९८२२०६५७४४, न्यु मुंबई सुभाष गोगिया झुलेलाल मंदिर - ९८२११३०५९०, बीड- डॉ. मदनलाला जेसवानी- ९८९०४६०७००, ठाणे संतराम माखिजा - ९८१९५१०७४४, इंदोर प्रकाश मदनानी - ८९८९६२५९२०, डोंडेचा संजय पुरसवानी - ९९२३०९७६१६, नागपूर सिंधी सोशल फोरम - ९५०३२३७१६१, मोहन मंजानी - ७८८७५६५१४७, पुज्य समाधा आश्रम, प्रकाश चेतवानी - ७५८८७६३०८१, दिलीप सावलानी - ९३७३४५४८००, नाशिक प्यारा परिवार शाम मोटवानी - ९८२२०६१६१२, महेश नागपाल - ९८२२०९४९६०, हैदराबाद मॅरेज ब्युरो हिरा हॉल, अशोक वासवानी ९८४९४७७९७४, किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर.

आयोजकांना समाजसेवेची संधी मिळावी, या हेतूने संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याचे जवाहर कोटवानी, श्रीचंद्र नागराणी, कुमार मोटवानी, महेश मध्यान, महेश नगपाल व किशोर कंत्रोड यांनी सांगितले.


श्री गुरुकृपा समाज सेवा ट्रस्ट संचलित भुतकरवाडी रोड, सावेडी येथील सिंधू मंगल कार्यालयाचे नुकतेच नुतनीकरण पूर्ण झाले. या वास्तुचे उद्घाटन समारंभ गुरुकृपा ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप आहूजा, सेक्रेटरी सुरेश हिरानंदानी, खजिनदार महेश मध्यान यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी गायक बल्लू सचदेवच्या आवाजाने व भक्तीगीतांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. (छाया - अशोक थदानी)

# श्री झुलेलाल चालीसा पाठ व सिंधू मंगल कार्यालयाचे नूतनीकरण समारंभ उत्साहात

नगर- श्री गुरुकृपा समाज सेवा ट्रस्ट संचलित भुतकरवाडी रोड, सावेडी येथील सिंधू मंगल कार्यालयाचे नुकतेच नुतनीकरण पूर्ण झाले. नव्या रूपात व साजसज्जेसह तयार झालेल्या वास्तूचा उद्घाटन समारंभ गुरुकृपा ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप आहूजा, सेक्रेटरी सुरेश हिरानंदानी, खजिनदार महेश मध्यान यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक अनिल बोरुडे, रमेश तनवाणी, रूपचंद मोटवानी, जयकुमार खूबचंदानी, हरीश खूबचंदानी, ग्यान नवलानी, रमेश कुकरेजा, राणा किरतानी, कपिल किंगर, सुनील बजाज, सागर आहुजा, ठाकूर नवलानी, मनीष आहूजा, जयकुमार रंगलानी, कुणाल मध्यान, प्रेम बजाज, सीए रितेश हिरानंदानी, अमित चिमनानी, तसेच समाजातील अनेक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व श्री गुरुकृपा ट्रस्टचे इतर पदाधिकारी व समाज बांधव व महिला उपस्थित होत्या.

प्रारंभी भगवान झुलेलालजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून बहिराणो साहिबची पूजा, आरती व पल्लवचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर सध्या सिंधी बांधवांचा चालीहो उत्सव अर्थात ४० दिवसांच्या उपवासाचा पर्व सुरू असून त्यानिमित्त आहूजा परिवार, मध्यान परिवार, व किंगर परिवार यांनी संयुक्तपणे गायक बल्लू सचदेव व सहकार्यांचा श्री झुलेलाल चालीसा पाठ व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या संगीतमय कार्यक्रमाचा उपस्थितांनी मनसोक्त आनंद घेतला. गायक बल्लू सचदेवच्या सुमधुर आवाजाने व भक्तीगीतांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी सुरुची भोजन व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आले होते.

# रंगारगल्लीतील लाडक्या बहिणींनी बांधल्या आमदार संग्राम जगताप यांना राख्या

### सर्व महिलांना दिल्या भेटवस्तू

नगर - रंगारगल्ली येथील लाडक्या बहिणींनी आमदार संग्राम जगताप यांना राख्या बांधल्या. यावेळी सौ.सुरेखा दंडी, सौ. आरती आढाव, सौ.उज्वला भांगे, सौ.योगिनी सातपुते, सौ.पल्लवी मोडक आणि परिसरातील महिला उपस्थित होत्या.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्याकडून सर्व लाडक्या बहिणींना रक्षाबंधन भेट म्हणून साड्या देण्यात आल्या.


रंगारगल्लीतील लाडक्या बहिणींनी आमदार संग्राम जगताप यांना राख्या बांधल्या.

प्रत्येक महिलांनी आमदार संग्राम जगताप यांना ओवाळणी करून राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला. आभार प्रदर्शन सौ.योगिनी सातपुते यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रवी दंडी, चेतन मोडक, गर्जेंद्र कवडे, अजिंक्य गुरावे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. अमोल बागुल यांनी बनवली लोकशाही राखी

## रक्षाबंधनानिमित्त अहमदनगर जिल्हा स्वीप समितीचा उपक्रम

नगर - जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहमदनगर यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या अनुषंगाने मतदार नोंदणी तसेच जनजागृतीसाठी जिल्हा मतदारदूत डॉ.अमोल बागुल यांच्या संकल्पनेतून रक्षाबंधनानिमित्त लोकशाही राखी तयार करण्यात आली आहे. यावर भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणीच्या वेबसाईटचा क्यु आर कोड तयार करून डकवण्यात आला आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी-महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम-२०२४ (दुसरा) राज्यभरात चालू असून अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या मार्गदर्शनातून लोकशाही राखी तयार करण्यात आली आहे. या वैशिष्ट्यपूर्ण राखीवर भारतीय ध्वजासह क्यू आर कोड डकवण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी शाहूराज मोरे, स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी अशोक कडूस, स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, तहसीलदार प्रदीप पाटील, नायब तहसीलदार प्रशांत गोसावी व सर्व स्वीप समिती सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

सुमारे ५०० लोकशाही राख्या तयार करण्यात आल्या असून बहिणीने भावाला बांधलेल्या राखीवरील हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर भारत निवडणूक आयोगाची वेबसाईट खुली होते व यावरील सामान्य मतदारांसाठी नवीन नोंदणी-अर्ज क्रमांक सहा, परदेशी मतदारांसाठी नवीन नोंदणी-अर्ज क्रमांक सहा-अ, मतदार यादीतील नावाचा प्रस्तावित समावेश अथवा हटवण्याबाबत आक्षेप -अर्ज क्रमांक सात, निवासस्थानामध्ये स्थलांतर' विद्यमान मतदार यादी मधील नोंदी दुरुस्त करणे, मतदार ओळखपत्र बदलणे, दिव्यांग यादीचे चिन्हांकन -अर्ज क्रमांक आठ, आधार कार्ड मतदान कार्डशी लिंक करणे - अर्ज क्रमांक सहा ब, तसेच मतदार यादीत नाव शोधणे, ई- इपिक डाऊनलोड करणे, स्वतःचे मतदान केंद्र आणि मतदान अधिकारी जाणून घेणे, विधानसभा संसदीय मतदार संघाचा तपशील, बीएलओ निवडणूक अधिकारी तपशील तसेच भारत निवडणूक आयोगाचे विविध प इत्यादी गोष्टी फक्त एकाच क्यूआर कोडमध्ये माहिती होतात. मतदार नोंदणी व जनजागृतीच्या उपक्रमासाठी ज्यांना अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या माध्यमातून निर्मित लोकशाही राखी हवी असेल त्यांनी ९००२१०९००३ या देशातील पहिल्या अहमदनगर स्वीप केअर व्हॉटसअप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.


भारतीय सिंधू सभा च्या वतीने रक्षाबंधन बालघरच्या निराधार मुलांसमवेत साजरी करुन त्यांना विविध भेट वस्तु देण्यात आले. यावेळी पुज्य बहिराणो साहिबची पुजा व आरती करताना दामोदर बठेजा, रमेश कुकरेजा आदी. (छाया - अशोक थदानी)

# भारतीय सिंधू सभेतर्फे बालघरच्या निराधार मुलांसमवेत रक्षाबंधन साजरी

नगर - येथील सामाजिक संस्था भारतीय सिंधू सभाच्यावतीने रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला सावेडीतील सतनाम साक्षी गोशाळेत आयोजित कार्यक्रमात बालघर प्रकल्प या संस्थेतील अनाथ निराधार मुला मुलीं समवेत रक्षाबंधन साजरा केला. यावेळी पालघर प्रकल्पाच्या मुलांना सिंधी समाजाच्या भगिनींनी राखी बांधली व बालघरच्या मुलींनी सभेच्या कार्यकर्त्यांना व समाज बांधवांना राखी बांधत रक्षाबंधन साजरा केला. याप्रसंगी मुलांना अनेकांनी रोख स्वरूपात ओवाळनी दिली तसेच संस्थेच्यावतीने व समाजातील दानशुरांच्यावतीने त्यांना शालोपयोगी साहित्य, खेळणी तसेच जीवनावश्यक वस्तू, किराणा आदी साहित्य दिल्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले तसेच मिष्टान्न जेवण व आदारातिथ्याने मुले भारावुन गेली होती. मुलांच्या वतीने त्यांच्या समवेत आलेल्या शिक्षकांनी संस्थेचे आभार मानले.

भारतीय सिंधू सभेच्यावतीने सिंधी समाजाचे इष्टदेव झुलेलाल देवजींच्या चालीहो उत्सवानिमित्त प्रारंभी पूज्य बहिराणो साहिबची पूजा करण्यात आले. तसेच आरती व पल्लवचा कार्यक्रम झाला. यावेळी भावीक उपस्थित होते.

तसेच याप्रसंगी गो शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ विभाजन विभीषीका स्मृती दिवस (१४ ऑगस्ट) निमित्त एक फोटो प्रदर्शनी लावण्यात आली होती. त्यात फाळणीच्या वेळी (१९४७ साली) घडलेल्या दुःखद घटनांशी संबंधित फोटो लावण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन रुपचंद मोटवानी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनास उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेकांनी प्रदर्शनी पाहताना फाळणीच्या वेळी लोकांनी सहन केलेल्या हालअपेष्टाबद्दल हळहळ व्यक्त केली.

या एकत्रित कार्यक्रमाप्रसंगी गायक किशोर शेरवानी यांचा भक्ती गीतांचा भजन संध्या कार्यक्रम झाला. सुमधुर संगीतमय कार्यक्रमांचा मुलांनी आणि उपस्थितांनी आनंद घेतला. भारतीय सिंधू सभेचे प्रदेश उपाध्यक्ष दामोदर बठेजा यांनी जिल्हाध्यक्ष रमेश कुकरेजा यांच्या दोन वर्षाच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल सत्कार केला. यावेळी सिंधी समाजाचे सुरेश हिरानंदानी, जयकुमार रंगलानी, डॉ.टेकवाणी, महेश केवलरामाणी, मनु कुकरेजा, रमेश तनवानी, हरगोविंद चिमनानी आदी तसेच सतनाम साक्षी गोशाळेचे जीवतराम हिरानंदानी, सुनिल बजाज, मुकेश जाधवाणी, नंदलाल बजाज, खानचंद बजाज, मुलचंद तलरेजा आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जितेश सचदेव, किशन पंजवानी, मोती आहुजा, व्दारका किंगर, राहुल बजाज, सागर बठेजा, मुकेश आसनानी, किशोर रंगलानी, ओम कुकरेजा, जयकुमार खुबचंदानी, अशोक आहुजा, प्रेम बजाज, जियंद रोहिडा, अशोक नवलानी, अशोक सचदेव, राम बालानी, अजय शादीजा, मनोज कृपलानी, रुपचंद मोटवाणी, आनंद कृष्णानी, उत्तम छुटाणी, शंकर अंदानी, हरि पमनानी आदिंनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचालन जितेश सचदेव यांनी केले व दामोदर बठेजा यांनी आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# धम्माल मनोरंजन

## शब्दरंजन

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ | | ■ | ७ |
| | ■ | ८ | ९ | | | ■ | | ■ | | ■ | १० | |
| ११ | | ■ | १२ | | ■ | १३ | | १४ | | | ■ | |
| ■ | ■ | ■ | | ■ | १५ | | ■ | | ■ | ■ | १६ | |
| १७ | १८ | १९ | ■ | २० | | | | ■ | २१ | ■ | २२ | |
| २३ | | | | | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| २४ | | | ■ | २५ | | | ■ | २६ | | | | २७ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | २८ | | | ■ | २९ | |
| ■ | ३० | ■ | ३१ | | ३२ | ३३ | | ■ | ■ | ३४ | ■ | |
| ३५ | | ३६ | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | | | |
| ३९ | | | ■ | ४० | ■ | ४१ | | | | ■ | ■ | |
| ■ | | ■ | ४२ | | | | ■ | ■ | ४३ | | ४४ | ■ |
| ४५ | | | | | ■ | ४६ | | | | ■ | ४७ | |

### आडवे संकेत

१) शंभराचा गट
३) अत्तराचे XX लावणे
५) पिढीजात ८)दयाळू
१०) हाल, अवस्था
११) एक धान्य
१२) लसुणाचा सुटा भाग
१३) लोकमोजणी
१५) एक इंग्रजी अक्षर
१६) भिलाव
१७) मदत; सहारा
२०) पहाटी किल्ल्याचा सर्वात उंच किल्ला
२२) मॅजिस्ट्रेट
२३) सहाय्यक
२४) वचक, भिती
२५) इंग्रजी कारण
२६) आकड्याद्वारे करावयाचे गणित
२८) एक फूलझाड
२९) सूड, खालचा भाग
३१) झाडाखालचा कचरा
३५) एकामागून एक
३७) चोऱ्या करणारा
३८) क्षणिक संजावात
३९) टिपांसह
४१) पोळ्या लाटण्याचे लाकडी साधन
४२) नवरदेवासोबतची मुलगी
४३) पक्का, उग्र, तापट
४७) नवऱ्याची आई

### उभे संकेत

१) एक फूलझाड
२) पोष्टातून आलेले कागद
३) हिंदूचा एक सण
४) बांबू, बासा
५) फारसी भाषेत तरुण
६) जादूटोणा
७) निशाण लावण्यात पटाईत
९) असली विरुद्ध
१३) जय जवान XX
१४) एक धान्य
१५) अद्रक
१६) वर्णाच्या द्वारे करावयाचे गणित
१७) मदत, सहारा
१८) शर्ट
१९) रात्रीला उगवणारे
२०) श्रीकृष्ण
२१) चाफ्याच्या फूलाची कळी
२६) आकडा, पर्व
२७) व्याकुळ होणे
२८) चुकवाचुकव
३०) लहानपणापासुनचा मित्र
३१) शरीराची मागील बाजू
३२) चो पा चा अक्षरबदल
३३) लहान मुलांचा एक खेळ
३४)XX तारी त्याला कोण मारी
३५) उलटा स ला
३६) नीचकृत्य
३८) टोलटॅक्स
४०) पकडणे
४२) उडी, मिठी
४४) नाडा, कशा तऱ्हेचा

### कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | धा | नी | ■ | ह | वा | ह | वा | सा | ■ | दु | वा |
| ष्ट्र | ■ | म | र | तु | क | डा | ■ | ■ | ख | ट | प | ट |
| प | ठ | ण | ■ | ळ | ■ | ■ | क | म | र | प | ट्टा | ■ |
| ती | ■ | ■ | खो | ■ | त | प | ■ | ध्य | ■ | ट | ■ | ■ |
| शा | र | दा | ■ | व | डा | पा | व | ■ | का | प | ड | ■ |
| स | म | य | सु | च | क | ■ | हि | वा | ळा | ■ | र | सा |
| न | व | रा | ■ | न | ■ | से | वा | ■ | सा | व | का | र |
| ■ | णे | ■ | अ | भं | ग | ■ | ट | ■ | व | र | ळी | ■ |
| मा | ■ | ग | र | ग | र | णे | ■ | तो | ळा | ■ | ■ | ख |
| मे | ■ | डा | का | ■ | म | ■ | ■ | ■ | ■ | लो | क | र |
| सा | त | ■ | ट | क | म | क | टो | क | ■ | क | ल | प |
| स | ह | ज | ■ | ■ | सा | ल | प | ट | ■ | ■ | क | ■ |
| रा | ■ | रा | ज | म | ला | ई | ■ | क | ढी | प | त्ता | ■ |

## विनोद



**मुलगा** : बाबा आज मला फिरायला जावेसे वाटते. चला, आपण सूर्यास्त पहायला जाऊ.
**वडील** : आज नको बाळा, आपण उद्या सकाळी जाऊ.

.............................................

**अजय** : बाबा गेल्या महिन्यात ताईचे डोके दुखत होते म्हणून तुम्ही तिला चष्मा आणला. आज माझे मनगट दुखते आहे.
**बाबा** : मग मी काय करु?
**अजय** : मला घड्याळ आणून द्या.

## दिनविशेष २३ऑगस्ट २०२४

१७५४: फ्रान्सचा राजा लुई (सोळावा) . (मृत्यू: २१ जानेवारी १७९३)
१८५२: भारतीय वैद्य आणि दानकर्ते राधा गोबिंद कार. (मृत्यू: १९ डिसेंबर १९१८)
१८७२: भारतीय वकील आणि राजकारणी तांगुतरी प्रकाशम. (मृत्यू: २० मे १९५७)
१८९०: न्यूज–डे चे सहसंस्थापक हॅरी फ्रँक गग्रेहॅम . (मृत्यू: २२ जानेवारी १९७१)
१९१८: श्रेष्ठ कवी विंदा करंदीकर उर्फ गोविंद विनायक करंदीकर यांचा धालगल सिंधुदुर्ग येथे जन्म. (मृत्यू: १४ मार्च २०१०)
१९४४: चित्रपट अभिनेत्री सायरा बानू .
१९५१: जॉर्डनची राणी नूर.
१९७३: मॉडेल आणि अभिनेत्री मलायका अरोरा खान.

मृत्यू / पुण्यतिथी
६३४: अबू बकर अरब खलिफा .
१३६३: डहाण राजवटीचे संस्थापक चेन ओंलियांग .
१८०६: फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ चार्ल्स कुलोम यांचे निधन. (जन्म: १४ जून १७३६)
१८९२: ब्राझीलचे पहिले अध्यक्ष डियोडोरो डा फोन्सेका . (जन्म: ५ ऑगस्ट १८२७)
१९७१: रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर –मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री,
आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). सांगत्ये ऐका नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (जन्म: २४ जानेवारी १९२४)
१९७४: डॉ. शंकर दामोदर पेंडसे – मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (जन्म: २८ फेब्रुवारी १८९७)
१९७५: पं. विनायकराव पटवर्धन –नामवंत शास्त्रीय गायक, गुरू, संगीतप्रसारक व अभिनेते. १९३२ मध्ये त्यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. (जन्म: २२ जुलै १८९८)
१९९४: इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला जलतणपटू आरती साहा . (जन्म: २४ सप्टेंबर १९४०)
१९९७: ग्रेनाडा चे पहिले पंतप्रधान एरिक गेयरी . (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२)
२०१३: आर.जे. कॉमन रेल्वेमार्ग गटाचे संस्थापक रिचर्ड जे. कॉर्मन . (जन्म: २२ जुलै १९५५)
२०१८: कुलदीप नय्यर,प्रसिध्द लेखक,पत्रकार,मानवाधिकार कार्यकर्ते आणि राजनेता (जन्मतारीख: १४ ऑगस्ट, १९२३)




- १ जुन २००१ रोजी कोणत्या देशातील राजघराण्याची सामुहिक हत्या करण्यात आली आणि आरोपीनेही स्वतः गोळी झाडून आत्महत्या केली?**–नेपाळ.**
- G-१५ देशांचे शिखर सम्मेलन २००२ मध्ये कोठे आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे?**–कराकश (व्हेनेझुएला).**
- मानव विकास अहवाल– २००१ नुसार जगात किती लोकांना एड्स या रोगाची बाधा झाली आहे?**–३.५ कोटी.**
- आंतकवादाच्या विरोधात भारत सरकारने एकजुटता दिवस म्हणून कोणता दिवस पाळला?**–१८ सप्टेंबर.**
- जागतिक व्यापार संघटनेत सप्टेंबर २००१ मध्ये कोणत्या देशाला सदस्यत्व देण्यात आले?**–चीन व तैवान.**
- जहाजावरुन जहाजावर प्रहार करण्यासाठी भारताने विकसित केलेल्या क्षेपणास्त्राचे नाव काय?**–धनुष.**
- आसामची नियोजित राजधानी कोणती? **–प्राणज्योतिजपूर.**
- तहलका घोटाळा, ऑपरेशन वेस्ट एंड या कंपनीने कधी उघडकीस आणला?**– १३ मार्च २००१ रोजी.**
- २००१ सालची भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?**–आसिम हाशम प्रेमजी (विप्रो कंपनीचे मालक)**
- पाकव्याप्त काश्मिरच्या राजधानीचे नाव काय? **–मुझफराबाद.**
- जगातला सर्वात कमी भ्रष्टाचारी देश कोणता?**–फिनलंड.**
- जगातला सर्वात जास्त भ्रष्टाचारी देश कोणता?**– नायजेरिया.**
- २००१ च्या जनगणनेनुसार सर्वात कमी लोकसंख्येची घनता असणारे राज्य कोणते?**–अरुणाचल प्रदेश.**
- २००१ च्या जनगणनेनुसार भारतात लोकसंख्या वाढीचा दर किती होता?**–१.९५ टक्के.**
- भारतातील सर्वात कमी लोकसंख्येचा केंद्रशासित प्रदेश कोणता?**–लक्षद्विप.**
- २००१ सालात कोणत्या देशात मूळ आशियाई असलेल्या नागरिकांत व स्थानिक नागरिकांमध्ये हिंसक घटना घडल्या होत्या?**–इंग्लंड.**
- ११ सप्टेंबर २००१ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटर व अमेरिकी लष्कराच्या कोणत्या मुख्यालयास अपहरण केलेल्या दहशतवादी विमानांनी धडक दिली होती?**–पेटॅगॉन.**
- भारतातील सर्वात मोठा नाविक तळ कोठे तयार केला जात आहे?**–कारवार (कर्नाटक)**
- प्रदीव दळवी लिखित पसायदान हे नाटक कोणाच्या जीवनावर आधारित आहे?**–शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या.**
- कारगीलनामा हा मराठीतील ग्रंथ कोणत्या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे?**–गन्स अॅन्ड रोझेस.**
- देशातील सर्वाधिक खपाचे दैनिक कोणते? **–दै. भास्कर.**
- अमेरिका– इराक युद्धाच्या वेळी अमेरिकेने अधिक लष्करी तुकड्या रवाना केल्यास अमेरिकेवर थेट हल्ला करण्याचा निर्णय कोणत्या देशाने जाहीर केला होता?**–उ. कोरियाने.**
- कोणत्या देशाने धूम्रपानावर कडक निर्बंध लादलेत? **–पाकिस्तान सरकारने.**
- आफ्रिकेला ग्रासणाऱ्या मलेरियाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मायक्रोसॉफ्टचे चेअरमन बिल गेट्स यांनी किती डॉलरचे अर्थसहाय्य केले? **–१६ कोटी ८० लाख डॉलरचे.**
- २००२ मध्ये विश्व कप फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे?**–द. कोरिया आणि जपान येथे.**

## सांगा कोण?

**१) एका नारीचा काळा रंग**
**आपल्या सोबत ती पण दंग**
**उजेडात ती सोबत राही**
**अंधार दिसला की निघून जाई**
**२) डोक्यावर जटा अंगावर कपडा**
**नव्या गुरुचा चेला आहे**
**पुजासाठीही याला मान**
**शेतात मोठा झाला आहे**

उत्तर : १) सावली २) मक्याचे कणिस

- संत्र्याची साले १०० ग्रॅम घेऊन वाळवून वाटून चूर्ण करावे. यात १०० ग्रॅम बाजारीचे पीठ व १२ ग्रॅ हळद मिसळून पाण्यात भिजवून चेहऱ्यावर लावावे. नंतर स्वच्छ पाण्याने चेहरा धुवावा. काही दिवसात चेहरा उजळून निघेल.
- लिंबाचा रस गाळलेला, दोन तोळे गुलाब अर्क, २ तोळे ग्लिसरीन, मिसळून बाटलीत भरुन ठेवावे. रात्री झोपताना चेहऱ्यावर चोळून लावावे. वीस दिवस उपचार केल्याने मुरुमपुटकुळ्या दूर होऊन त्वचा मऊ व तजेलदार होते.

## फिल्मीरंजन

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ■ | ३ | | | ■ | ४ | ■ | ५ |
| ■ | ■ | | ■ | ■ | ६ | | ■ | ■ | ■ | | ■ | |
| ७ | | | | ८ | ■ | ९ | | | | | | ■ |
| ■ | ■ | | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | १० |
| ११ | ■ | | ■ | | ■ | १२ | | १३ | ■ | ■ | १४ | |
| | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | | ■ | १५ | ■ | |
| ■ | १६ | ■ | १७ | | | | ■ | १८ | | | ■ | |
| ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | |
| १९ | | | | ■ | ■ | ■ | २० | | ■ | २१ | | |
| | ■ | ■ | २२ | | २३ | | ■ | २४ | | | ■ | ■ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | २५ | ■ | ■ | ■ | ■ | २६ |
| २७ | | २८ | | ■ | | ■ | | ■ | २९ | | | |
| | ■ | | ■ | ३० | | | | | | ■ | ■ | |



### आडवे संकेत

१) सन १९९२ मध्ये आलेली खिलाडी चित्रपटाची नायीका.
३) शिवपूरी (सहनायीका)
६) ये तेरा घर ये घर (चित्रपट)
७) सन २००१ मध्ये अजीज सेजावल दिग्दर्शीत या चित्रपटात संजय कपूर आणि ममता कुलकर्णी होते.
९) या चित्रपटात अमिताभ बच्चन, शिल्पा शेट्टी आणि मनिषा कोईराला होते.
१२) जोशी (नायीका)
१४) सिर्फ (चित्रपट)
१७) धर्मेंद्र, राजीव कपूर आणि शत्रूघ्न सिन्हा यांचा एक चित्रपट.
१८) प्यार का (चित्रपट)
१९) ए.आर. (संगीतकार)
२०) सन १९९४ मध्ये आलेला हा सोनाली बेंद्रेचा पहिला चित्रपट होता.
२१) सन २००१ मध्ये आशुतोष गोवारीकर दिग्दर्शीत या चित्रपटात आमिर खान आणि ग्रेसी सिंह होते.
२२) धर्मेंद्र, राजेंद्र कुमार आणि माला सिन्हाचा एक चित्रपट.
२४) शिरोड्कर (नायीका)
२७) अजय देवगन आणि तब्बुचा एक चित्रपट
२९) सन १९९९ मध्ये सुनील दर्शन दिग्दर्शीत या चित्रपटात अक्षय कुमार आणि करिश्मा कपूर होते.
३०) सन १९९६ मध्ये आलेल्या दरार या चित्रपटतील खलनायक.

### उभे संकेत

२) सन २००३ मध्ये आलेला चलते चलते चित्रपटाचा नायक.
३) मिथून चक्रवर्ती आणि जॉनी लिव्हरचा एक चित्रपट.
४) सन १९९९ मध्ये अब्बास मस्तान दिग्दर्शीत या चित्रपटात शाहरुख खान, ट्विंकल खन्ना होते.
५) दत्ता (नायीका)
८) वाजपेयी (नायक)
१०) सन १९८१ मध्ये आलेल्या एक दुजे के लिए या चित्रपटातील नायक.
११) सडकछाप चित्रपटाचा नायक.
१३) सन १९९९ मध्ये आलेल्या हिंदुस्थान की कसम या चित्रपटाचे दिग्दर्शक.
१५) गरीबोंका (चित्रपट)
१६) डीनो मारीया आणि बिपाशा बासू चा एक चित्रपट.
१७) सन १९९९ मध्ये आलेल्या सरफरोश चित्रपटाचे संगीतकार.
१९) सन १९९१ मध्ये आलेल्या नरसिम्हा चित्रपटाचा नायक.
२१) मंगेशकर (गायीका)
२३) सन २००२ मध्ये आलेल्या या चित्रपटात अनिल कपूर आणि ऋषी कपूर होते.
२५) अतुल अग्निहोत्री, सोनाली बेंद्रे आणि मिथून चक्रवर्तीचा एक चित्रपट.
२६) दिव्या (नायीका)
२८) हम किसीसे नही (चित्रपट)
२९) तेरे नाम (चित्रपट)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | न | म | बे | व | फा | ■ | ■ | म | ■ | दो | ■ | ■ |
| ■ | ■ | ■ | ना | ■ | ■ | ■ | मा | धु | री | दी | क्षी | त |
| ■ | आ | ■ | म | ■ | ■ | कि | ला | ■ | ■ | ल | ■ | न |
| मे | ह | बु | बा | ■ | दि | ■ | मा | ■ | ■ | ■ | अ | ब |
| ■ | ■ | ■ | द | ■ | ल | व | ल | व | ल | व | ■ | द |
| जी | ते | है | शा | न | से | ■ | ■ | क्त | ■ | ■ | ■ | न |
| व | ■ | ■ | ह | ■ | ■ | ■ | ■ | ■ | अ | ■ | ■ | ■ |
| न | ■ | म | ■ | का | श | आ | प | ह | मा | रे | हो | ते |
| ए | ■ | हा | ■ | ■ | ■ | म | ■ | ■ | न | ■ | ■ | री |
| क | ■ | न | ■ | अ | ■ | द | र्द | ■ | त | ला | श | ■ |
| सं | गी | ता | बि | ज | ला | नी | ■ | ■ | ■ | ख | ■ | ज |
| घ | ■ | ■ | ■ | न | ■ | ■ | ■ | ■ | ■ | न | ग | मा |
| र्ष | ■ | ■ | ■ | बी | स | सा | ल | बा | द | ■ | ■ | ई |

## विरंगुळा

**पद्धतः बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व ◯ मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.**

त ा व भ ी ग ◯◯◯◯
ब ट ा अ ा य ई ा ◯◯◯◯
च ा म र ` द ॢ ◯◯◯◯

**अडचणींना आव्हानस्वरुप मानून ◯◯◯ आपण मात केली पाहिजे, तरच शिक्षणविकास होईल.**

| | | | |
|---|---|---|---|
| ख | ल | ब | त्ता |
| का | ट | छा | ट |

| | | | |
|---|---|---|---|
| प | रि | वा | र |
| वि | ट | क | री |

मागील उत्तर : खटपट

# 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



भारतीय संस्कृतिमध्ये उपासनेचे विशेष महत्त्व आहे. हिंदु, मुस्लिम, सीख, इसाई, जैन ह्या सर्व धर्मामध्ये वेगवेगळी उपासनेचे फार महत्त्व आहे. वेगवेगळी उपासनाची पद्धत आहे.

उपासना करण्याची पद्धति ही वेगवेगळी असू शकते, परंतु प्रत्येकाचे लक्ष आपल्याला संयमात सुखी समृद्ध राहणे हाच असतो. उपासना करण्याचा सोपा मार्ग 'जप' करणे हा होय. आज आपण 'जप' या विषयावर चिंतन करणार आहोत. जप शब्दामध्ये दोन अक्षर आहे. पहिला शब्द आहे 'जे' – 'ज' शब्दाचे अर्थ आहे, जन्म–मरण. दुसरा शब्द आहे 'प' – 'प' शब्दाचे अर्थ आहे. पापाचे नाश जप करण्याचे अनेक मार्ग आहे – काही लोक 'राम–राम' उच्चारतात, तर काही लोक 'अल्लाह अकबर', तर काही लोक 'नमो अरिहंताणं' 'अरिहंत' उच्चारतात. हिन्दु परंपरेत जे स्थान 'गायत्री मंत्रा'चे आहे. बौद्ध धर्मात – प्रिशरण मंत्राचे आहे, तर जैन परंपरेत तेच स्थान 'नवकार' महामंत्राचे आहे. मंत्र म्हणजे काय? जप करताना जो अक्षर आपण उच्चारण करतो, तो आपले रक्षण करतो. त्याला 'जप' 'मंत्र' असे म्हणतात. मंत्राचे जप करून मानव आपल्या मनाला शांत प्रसन्न करत असतो.

या मनाला तीन प्रकारे वंश केले जाते– (१) ज्ञान (२) वैराग (३) अभ्यास या तिघांद्वारे मनाची चंचलता कमी करता येते. जर ज्ञान, वैराग आणि अभ्यास आपण केला तर जप शक्तिशाली होते. जपाद्वारे सिद्धि मिळते आणि मनाची शुद्धीदेखील होते. जपाद्वारे सर्व कार्य सिद्ध होते. तनमन शुद्ध होते व ह्यामुळे वातावरणसुद्धा शुद्ध होते. जसे– शेतकरी शेतात 'बी' पेरतो, तेव्हा त्याची जबाबदारी वाढते. खत, पाणी, सुरक्षता या सर्वांकडे लक्ष द्यावे लागते तसेच जपाचे महत्त्व अद्भूत आहे.

एक प्रधान राजाबरोबर चर्चा करत होता. असेच चर्चा करत असताना प्रधानजीला 'शिंका' सुरू झाल्या. तेव्हा प्रधानजी 'नमो अरिहंताणम्' असे उच्चार केले. हे उच्चार राजकुमारीने ऐकले. खेळता खेळता ती हे उच्चार ऐकताच बेशुद्ध पडली. तिच्या तोंडावर पाणी शिंपडले तेच राजकुमारी शुद्धीवर आली आणि म्हणू लागली, मी जंगलात होते, तहानलेली व भुकेलेली होती. राजाने विचार केला, ही राजवाड्यातच खेळत होती. मग ही जंगलात कशी, केव्हा गेली, तेव्हा प्रधानजी म्हणाले, राजन हिला बोलू द्या. राजकुमारीला ज्ञातीस्मरण झाले आहे. ती आपल्या पूर्व भवाबद्दल सांगत होती. ती पूर्वजन्मी घार होती, तेरा दिवस न पाणी न अन्न ह्याशिवाय ती घरट्यात बसलेली होती. कारण आकाशातून मुसळधार पाऊस पडत होता.

पाऊस थांबताच ती घार पाणी व अन्नासाठी घराबाहेर पडली. तोच शिकारीने बाण घातला. त्याच झाडाखाली एक महात्मा होते. त्यांच्यासमोरच ती घार पडली. त्या महात्म्याने 'नमो अरिहंताणम्'चा जाप चालू केला. हे ऐकताच त्या घारीचा मृत्यू झाला. ह्याचाच अर्थ आपण निरंतर जपाचे उच्चार केले तर त्याचे एक वर्तुळ तयार होते. या ध्वनीद्वारे शारीरिक व मानसिक रोज दूर होतात, ज्याचे जप बल अधिक आहे. त्यांच्या जवळ येणाऱ्या मानसिक विकृती दूर होतात. या जपद्वारे लवकिक, लोकोत्तर सिद्धि व कृपा प्राप्त होते, म्हणूनच 'जप' वर श्रद्धा ठेवा.

– सौ. सविता चोरडिया

# कापड बाजार जैन मंदिरात २४ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण (वरसगाठ) व महापूजा कार्यक्रम



नगर – नगरमधील कापड बाजार येथील श्री संभवनाथ जैन मंदिरात २४ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण (वरसगाठ) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० वाजता केतनभाई पंडीतजी जुन्नरवाला सत्तरभेदी पूजेला सुरुवात करतील. दुपारी १२.३९ या विजय मुहूर्तावर मुख्य ध्वजा चढविण्यात येईल. तसेच २४ जिनालयावरही याच मुहूर्तावर ध्वजा चढविण्यात येईल. ध्वजारोहण व सायंकाळी ६ वाजता अतिभव्य महापूजा आणि पुण्य पाप नगरी विषयांवर जिवंत नाटिका सादर केली जाणार आहे. चातुर्मासानिमित्त विराजमान तपस्विनी साध्वीजी ऋजूप्रज्ञाश्रीजी म.सा. आदी ठाणा ५ यांच्या निश्रामध्ये सदर कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती कापड बाजार जैन मंदिरचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी दिली.

अतिभव्य महापूजेमध्ये पाप व पुण्य हा विषय सुंदर नाटिकेद्वारे दर्शविला जाणार आहे. यात परमात्म्याची सुंदर अंगरचना, मनोहर रांगोळ्या, श्री ऋषभ संभव जैन संघाचे लहान मुले श्रवण, वज्रस्वामी अशा विविध भूमिका साकारतील. कोणी नरकयातना कथन करेल तर कोणी मोबाईलची आरती करेल. अतिशय उद्बोधक आणि मनाला दिशा देणारा हा यापूर्वी कधीही न झालेला भव्य कार्यक्रम असणार आहे. यातुन युवा पिढीला तसेच सर्वांनाच एक चांगला विचार मिळणार आहे. विशेषतः आताच्या पिढीवर सुसंस्कार होतील तसेच जीवनाला योग्य दिशा मिळण्यास मदत होईल. समाज कल्याणाचा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पाप पुण्य नगरी कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे लाभार्थी संघवी के. डी. भंडारी परिवार आहे. या धार्मिक व समाज प्रबोधनपर कार्यक्रमास सकल जैन संघाने उपस्थित रहावे असे आवाहन सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळाने केले आहे.

# अहमदनगर मध्ये प्रथमच २५ ऑगस्ट रोजी ऐतिहासिक भक्तामरची अमरगाथा नाटिका

नगर – श्री भक्तामर स्तोत्र जैन धर्मियांचे सर्वश्रेष्ठ स्तोत्र मानले जाते. अशी कथा प्रचलित आहे की, श्री मानतुंग आचार्यांनी ४८ कुलपांच्या आत कोठडीत बंद असताना या स्तोत्राची रचना केली. प्रथम तीर्थंकर ऋषभ देव भगवानची स्तुती त्याच्यात केली आहे. एक एक स्तुती करता करता त्यांचे कुलूप आपोआप तुटून पडले.

या नाटिकेत श्री ऋषभ देव यांची जन्म कथा भक्तामर स्तोत्रची रचना कशी झाली व त्याचा आत्ताच्या आयुष्यावर कसा प्रभाव पडतो असे तीन अंकी नाटिकेचे मुख्य आकर्षण आहे की इचलकरंजी येथून लेखिका व दिग्दर्शिका मनाली मुनोत या शंभर कलाकारांसोबत स्टेजवर ही नाटिका प्रस्तुत करणार आहेत

अहमदनगर येथील न्यू संकल्प स्मार्ट सखी व तिलोक रत्न स्थानक वासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदधाम अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमानाने या ऐतिहासिक सोहळ्याचे आयोजन २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत आनंदधाम, अहमदनगर येथे केले आहे. जास्तीत जास्त लोकांनी नवयुवकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सौरभ बोरा, आर. एस. बाफना जळगाव, रमेश फिरोदिया, राजेश भंडारी, सोनल चोपडा व संदीप भापकर यांनी केले आहे.

# टीम ५७ परिवाराच्या माध्यमातून स्वप्निल पर्वते यांचे सामाजिक कार्य दिशादर्शक

**आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; निरीक्षण व बालसुधारगृह आणि बाबावाडीतील विद्यार्थ्यांना भोजनाचे वाटप**

नगर – टीम ५७ परिवाराच्या माध्यमातून स्वप्निल पर्वते यांनी उभे केलेले सामाजिक कार्य दिशादर्शक आहे. त्यांनी व्यवसायात प्रगती साधून सामाजिक भावनेने योगदान देत आहे. मोठ्या शहरांच्या धर्तीवर नगरमध्ये जीम उभारुन आरोग्य चळवळ रुजविण्याचे काम त्यांनी केले आहे. मोठा मित्रपरिवार जोडून त्यांचे सुरु असलेले सामाजिक योगदान कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

स्वप्निल पर्वते मित्र परिवाराच्या वतीने निरीक्षण व बालसुधारगृह आणि बाबावाडी येथील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार जगताप बोलत होते. याप्रसंगी स्वप्निल पर्वते, राम पर्वते, कालिदास पर्वते, सचिन पर्वते, राज पर्वते, सचिन काळभोर, प्रशांत काळभोर, योगश मोहाडीकर, किरण बगळे, विशाल पवार, पै. वैभव लांडगे, दत्ता खैरे, आशिष बच्छावत, सुमित पर्वते, ऋषी पर्वते, संदीप सपाटे, नाना साळवे, दिनेश जाधव, अक्षय विधाते, अमोल म्हस्के, महेश अवघड, गिरीश कानडे, ओमकार पाटकर, राहुल सुतार, साहिल पेंटा, नयन सोनीमंडलेचा, प्रसाद चौधरी, एमएमए मॅट्रिक्स जीम, आनंद कन्स्ट्रक्शन व टीम ५७ परिवारचे सदस्य व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

स्वप्निल पर्वते म्हणाले की, समाजातील आजचे विद्यार्थी उद्याचा भविष्य आहे. वंचित घटकातील मुलांना प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येकाने हातभार लावण्याची गरज आहे. टीम ५७ परिवाराच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांना आधार देण्याचे काम सुरु आहे. उपेक्षितांना केलेली मदत हेच जीवनातील समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.



निरीक्षण व बालसुधारगृह आणि बाबावाडी येथील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनाचे वाटप प्रसंगी आ. संग्राम जगताप.

# शहरातील शैक्षणिक संस्थांमध्ये सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात

नगर – नगर शहरातील वैद्यकीय व शैक्षणिक संस्थांमध्ये महिला व मुलींसाठी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



भगवान फुलसौंदर

निवेदनात म्हटले आहे की, नुकतीच कोलकाता येथील मेडिकल कॉलेजमधील तरुण विद्यार्थिनीची ड्युटीवर असताना बलात्कार करून अमानुषपणे हत्या करण्यात आल्याची घटना ताजी असतानाच आता महाराष्ट्रातील बदलापूरमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर शाळेतीलच सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार घडला आहे.

महाराष्ट्र राज्यात महिला व अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार, बलात्कार, विनयभंग व हत्या अशा माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. ही अतिशय गंभीर बाब असून याकडे संवेदनशीलतेने व गांभीर्याने पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

अशा प्रकारच्या घटना आपल्या नगर शहरात घडू नयेत म्हणून अशा घटनांस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. नगर शहरातील वैद्यकीय व शैक्षणिक संस्थांमध्ये महिला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना आहेत जर नसतील तर आपल्या शहरातही अशा अत्याचाराच्या घटना घडू शकतात त्यानुषंगाने आपण संबंधीत वैद्यकीय व शैक्षणिक संस्थांचे संस्थाचालक, जबाबदार अधिकारी व पदाधिकारी यांची मिटिंग घेऊन त्यांना यासंदर्भात योग्य ती कार्यवाही होणे बाबत (उदा. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, डिजीटल तक्रार पेटी, विद्यार्थी सुरक्षा समितीची नेमणूक, शासकीय सुरक्षा रक्षक, इ.) आदेश व्हावेत, अशी मागणी फुलसौंदर यांनी केली आहे.

# राज्य शासनाच्या गणेशोत्सव स्पर्धेत नगरमधील मंडळांनी सहभागी व्हावे

## महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन

नगर – महाराष्ट्र शासनातर्फे सार्वजनिक गणेशोत्सवात जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, यासाठी गतवर्षात राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात आले होते. त्याच धर्तीवर ७ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. नगर शहरातही अनेक गणेश मंडळे गणेशोत्सवात विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. त्यामुळे शहरातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी राज्य शासनाच्या या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

लोकमान्य टिळक यांनी जन जागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव आयोजित करण्याची प्रथा सुरू केली. महाराष्ट्र शासनातर्फे सार्वजनिक गणेशोत्सवात जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे यासाठी सन २०२३ मध्ये राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात आले होते त्याच धर्तीवर ७ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२४ अंतर्गत मुंबई, मुंबई (उपनगर), पुणे व ठाणे या जिल्ह्यातुन प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातुन प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यात येणार आहे. त्यातुन राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास ५ लक्ष रूपये. द्वितीय क्रमांकास रूपये. २.५० लक्ष व तृतीय क्रमांकास १.०० लक्ष रूपए रकमेचे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. तर उर्वरीत ४१ जिल्हास्तरीय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रूपये पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ३१ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयासोबत स्पर्धा निवडीचे निकष व अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर अर्जाच्या नमुन्यानुसार स्पर्धेत सहभागी होवू इच्छिनाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला आकादमी, मुंबई यांच्या mahotsav-pldagmail.com या ईमेलवर ३१ ऑगस्ट पर्यंत या कालावधीत अर्ज करावा व या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभाग घ्यावा : दीपक दातीर

महाराष्ट्र शासनातर्फे सार्वजनिक गणेशोत्सवात जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, यासाठी गतवर्षात राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात आले होते. त्याच धर्तीवर ७ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय शासनाने घेतला असुन अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले असल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.



ज्ञानज्योती राज्यस्तरीय आदर्श माता पुरस्काराने नगरच्या सौ.मयुरी शाह यांचा सन्मान करण्यात आला.

# ज्ञानज्योती राज्यस्तरीय आदर्श माता पुरस्काराने नगर येथील सौ. मयुरीताई शाह यांचा सन्मान

नगर – कोल्हापूरच्या अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशनच्यावतीने पुणे कात्रज येथील अण्णाभाऊ साठे ऑडिटोरियम येथे सौ.मयुरी शाह यांना 'ज्ञानज्योती राज्यस्तरीय आदर्श माता' पुरस्काराने गौरविण्यात आले. या प्रसंगी लेखक व दिग्दर्शक सुरेश पाटोळे, दिग्दर्शक धनंजय भालेकर, यशदा पुणेचे मार्गदर्शक विवेक गुरव, बार्शी येथील स्मार्ट स्पीच अकादमीचे संचालक सचिन वायकुळे, 'अविष्कार'चे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार, पुणे जिल्हा शाखाध्यक्ष प्रकाश चौधरी, महासचिव विलास आंबेकर, डॉ. संतोष भोसले, पवनकुमार पवार आदी उपस्थित उपस्थित होते.

आदर्श कुटुंब व्यवस्थेसाठी झटणाऱ्या, धार्मिकतेची व सामाजिक कार्याची आवड व त्यासाठी अविरत कार्यरत असलेल्या, त्याचबरोबर आपल्या मुलाला चांगल्या सवयी, शिस्त व संस्कार करणारे व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतिनिधित्व करणारे बॅडमिंटन खेळाडू यश शाह यांच्या सौ.मयुरी शाह या मातोश्री आहेत.

सौ.मयुरी शाह यांच्या रक्तदानाच्या कार्याचा संयोजकांनी विशेष उल्लेख केला. कारण सौ.मयुरी यांनी O+ रक्तगटाचे महत्व ओळखून गरजू रुग्णांसाठी २८ वेळा रक्तदान करून अनेक गरजूंच्या आयुष्यात नवसंजवनी देऊन समाजाला एक चांगला संदेश देण्याचे कार्य केले आहे.

यावेळी 'अविष्कार'चे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार म्हणाले, अनेक वर्षांपासून आम्ही असे पुरस्कार देत असून समाजाप्रती आपले काही देणे लागते. त्याला अनुसरून आदर्श व अनुकरणीय असे अमूल्य कार्य करणाऱ्या मातांना विशिष्ट पुरस्कारांनी सन्मानित करतो. आजपर्यंत आम्ही सुमारे ९० हजार आदर्श मातांना पुरस्कारांनी सन्मानित केले असून त्याचे अनुकरण इतरांकडून व्हावे. यातून समाजाचा उत्कर्ष वाढावा त्यांच्या समाज कार्याचा गौरव व्हावा ही साधीसरळ अपेक्षा व्यक्त केली.

सौ.मयुरी या छायाचित्रकार अनिल शहा यांच्या पत्नी आहेत. पवनकुमार पवार यांनी आभार मानले.

# नगर शहरात २६ ऑगस्ट रोजी चर्मकार समाज जनजागृती अभियान

नगर– राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने १६ ऑगस्ट ते १ सप्टेंबर पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ३८ जिल्ह्याच्या ठिकाणी, समाज एकजुटी करिता, समाजाच्या अडीअडचणी जाणून भविष्यातील ध्येय धोरणे ठरविण्याकरिता चर्मकार समाज जनजागृती अभियान आयोजित केले आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप यांच्या प्रमुख उपस्थितीत, प्रदेशाध्यक्ष शांताराम कारंडे, प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनखाली युवक प्रदेशाध्यक्ष अमर तांडेकर, युवक प्रदेशाध्यक्ष रवींद्र खैरे हे युवकांशी संवाद साधणार आहेत. या अभियान दौऱ्यात राष्ट्रीय आणि राज्याचे अनेक नेते या मेळाव्याला उपस्थित राहणार असल्याची माहिती प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले यांनी दिली असून श्रमिक कार्यालय, कामगार भवन, टिळक रोड येथे २६ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता होणाऱ्या या मेळाव्यास अहमदनगर जिल्ह्यातील राष्ट्रीय, राज्य, फादरबॉडी, तालुका, शाखाप्रमुख आदींसह समस्त चर्मकार बांधव भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन उत्तर जिल्हाध्यक्ष अशोकराव कानडे, महिला जिल्हाध्यक्षा लताताई नेटके, जिल्हा संपर्कप्रमुख रघुनाथ आंबेडकर, महानगराध्यक्ष विशाल बेलपवार, नगर शहराध्यक्ष गणेश गोरे आदींनी केले आहे.

# नगरमध्ये २५ ऑगस्ट रोजी चर्मकारांचा गुणगौरव सोहळा

**गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या युवक-युवती व समाजबांधवांचा होणार गौरव; खा. भाऊसाहेब वाकचौरेंचा सन्मान**





नगर – चर्मकार विकास संघ व लोकनेते माजी आमदार सिताराम घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने २५ ऑगस्ट रोजी चर्मकारांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास सर्व चर्मकार समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे गुणगौरव सोहळा आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. मागील दहा वर्षापासून चर्मकार विकास संघाच्या वतीने गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करून, प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांसह विशेष यश प्राप्त करणाऱ्या युवक–युवती व समाजबांधवांचा सन्मान केला जातो. या सोहळ्यात चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या युवक–युवती व समाजबांधवांचा गुणगौरव केला जाणार आहे. तर शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा विशेष सन्मान होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



# २०२४ पॅरिस ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक विजेता नेमबाज सरबज्योत सिंग याचा सन्मान

दिल्ली मध्ये २०२४ पॅरिस ऑलिंपिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांधिक स्पर्धेत मनू भाकरसह कांस्यपदक विजेता खेळाडू सरबज्योत सिंग याला प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने बीके डॉ. दीपक हरके यांनी सन्मानित केले. यावेळी बीके क्षिरा दीदी, बीके विकास उपस्थित होते.



# राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या उपाध्यक्षपदी जैतून काकडे यांची निवड व युवकांचा जाहीर प्रवेश

राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस उपाध्यक्षपदी जैतून काकडे यांची निवड व ख्रिस्ती युवकांचा जाहीर प्रवेश आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन सरोजकुमार साळवे यांनी केले. यावेळी प्रा. माणिकराव विधाते, युवक शहर जिल्हाध्यक्ष इंजिनियर केतन क्षीरसागर, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, वैभव ढाकणे, जितू गंभीर, गजेंद्र भांडवलकर, सागर गुंजाळ, साहेबान जहागीरदार, भूपेंद्र परदेशी, अभिजीत काकडे, प्रणील काकडे, अभिषेक साळवे, अनिकेत साळवे, अनिकेत गायकवाड, विराज सोनवणे, वेदांत क्षत्रिय, निलेश बनसोडे, रितेश बनसोडे, प्रितेश बनसोडे, प्रशांत बनसोडे, प्रतीक गायकवाड, प्रतीक पंडित, आशिष त्रिभुवन, कुणाल गायकवाड, गणेश क्षत्रिय, मनीष क्षत्रिय आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार पाटोळे सर यांनी मानले.

